# पोरसपुराण



लेखिका
श्रीमती सुरेखा अ. तेरदाळकर

# पोरस पुराण

**लेखक अनुवादक**
श्रीमती सुरेखा अरविंद तेरदाळकर
१०३, आर १९, गणाधीश सोसायटी,
सुदर्शन नगर, एम.आय.डी.सी.,
डोंबिवली पूर्व ४२१२०३
फोन. : ९८६७०१३९५२

**प्रकाशक :**
अमीत अरविंद तेरदाळकर
सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

**प्रथम आवृत्ती : २०२२**

**अक्षर रचना :**
श्रीमती सुरेखा अरविंद तेरदाळकर

**मुखपृष्ठ :**
श्रीमती सुरेखा अरविंद तेरदाळकर

**मुद्रक :**
सेजनाथ डिजीटल, डोंबिवली (पूर्व)

**मुल्य : ८०/-**



# थोडसं माझं ही

मला वाचनाची खूप आवड आहे आणि इतिहासाबद्दल कुतुहल आहे, त्यामुळे मी हे **पोरसपुराण** चे लेखन केले आणि अध्यात्माची ही आवड असल्यामुळे २०१८ साली माझ्या **श्री राघवेंद्र स्वामी चरित्र** या पुस्तकाचे प्रकाशन झाले होते.

S. Arundalkar

श्रीमती सुरेखा अरविंद तेरदाळकर

# मनोगत

मनोगत लिहिताना मला खूप आनंद होत आहे. दीड वर्षाच्या लॉक डाऊन मध्ये काहीतरी चांगले लिखाण करावे असे वाटत होते. त्यात कौटिल्य आचार्य चाणक्य यांच्या बद्दल अभ्यास करताना मला त्यांच्याकडूनच पौरव राष्ट्र, मौर्य घराणं ह्याबद्दल खूप माहिती मिळाली. मला पुरू राजा बद्दल लिहावेसे वाटले.

वाचकहो, माझी मातृभाषा कन्नड आहे, सहाजिकच मी लिहिताना मला चांगले मार्गदर्शक मिळाले म्हणून पोरस पुराण ह्या पुस्तकाचे लेखन लिहून झाले. डोंबिवलीत स्वरूपिणी मंडळ आहे, प्रतिभाताई बिवलकर या स्वरूपिणी मंडळाच्या संस्थापिका आहेत. यांच्याकडून मला लिहिण्यासाठी प्रोत्साहन मिळाले त्यांना गीता गौरव पुरस्कार, गोमती पुरस्कार, चतुरंग पुरस्कार आणि व्यास क्रिएशन पुरस्कार असे अनेक पुरस्कार मिळाले आहेत. कथासंग्रह ,चरित्र ज्योतिष विषयक ,आध्यात्मिक, धार्मिक अशा अनेक विषयांवर त्यांनी लेखन केले आहे. गीता, ज्ञानेश्वरी, जैमिनी अश्वमेध, अमृतानुभव ,चांगदेव पासष्टी, गणेश पुराण, कालिदास यावरील त्यांची प्रवचने हजाराच्यावर  आहेत. अश्या विद्वान मंडळींचा मला पाठिंबा मिळाल्याने हा लेख लिहून झाला.

माझी मैत्रीण उज्वला देवधर तिच्या शिवाय हे पुस्तक पूर्ण झालेच नसते. ही माझी सखी इनरव्हील क्लब ऑफ डोंबिवली ईस्ट ची माजी प्रेसिडेंट आहे. त्यांना रांगोळी काढण्याचा छंद आहे. मुख्य म्हणजे त्यांना समाजसेवेची पण आवड आहे. यांच्याबद्दल मी काय बोलू, शांत सोज्वळ मितभाषी आहे. तिच्यामध्ये उत्कृष्ट छायाचित्रकारिता लपलेली आहे. मी पोरस ची शौर्यगाथा लिहित असता माझा नातू ऋषिकेश याने या लेखनाला

पोरस पुराण हे नाव दिले तो आता अकरा वर्षाचा आहे, त्याला या सर्व गोष्टींची आवड आहे. माझी सून पूजा आणि नातू हृषिकेश यांचा खूप मोठा सहभाग आहे

माझे वडील पोलीस खात्यात असल्याने त्यांचा तो रुबाब त्यांच्या शिस्तबद्ध जीवनशैली हे सर्व पाहून मला पण सैन्यात भरती व्हायचे होते ते झाले नाही या लेखनामुळे मी स्वतः पोरस ची आई आणि भार्या लाची ह्या भूमिकेत जगले माझ्या मनातील पात्राला जिवंत ठेवले. माझ्या जीवनाचा जोडीदार माझे पति अरविंद, यांच्या आठवणी शिवाय हे पुर्ण होणारच नाही. ते जे काम करायचे ते उत्कृष्ट करायचे ऑफिस सांभाळून विणकाम करणे, चविष्ट पदार्थ करुन खायला घालणे आणि नेहमी मी जे काही करते त्या साठी पाठिंबा देणे म्हणूनच मी त्यांना मानसीचा कलाकार तो अखंड माझ्या हृदयी वसतो असेच नमूद करेन.

पुरू पुरुषोत्तम ह्यांना आईच्या पोटात असतानाच अखंड भारताचे बाळकडू मिळाले होते. आई अनसूया वडील बमनी महाराज दोघेही अखंड भारताचे स्वप्न पाहिले होते ते पुरुषोत्तम यांच्याकडून पूर्ण झाले पुरू राजा कोणतेही चांगले काम करण्यासाठी कितीही कष्ट कितीही त्रास सोसण्याची त्यांची तयारी होती सिकंदर सर्व प्रकाराने पुरू राजाला त्रास देत होते ते सर्व सहन करून आपला भारत देश खंड खंड न होता अखंड ठेवण्याचे काम पुरू राजा आणि त्यांच्या बरोबर आपले भारतीय वीर सैनिक वीर योद्धदे तनमनधन अर्पण करून योगदान दिलेले आहेत. वाचकहो जसे शिवाजी महाराजांना समर्थ रामदास स्वामींचे आशीर्वाद मिळाले तसेच पुरू राजांना आचार्य चाणक्य यांचे आशीर्वाद होते. असे राजे परत होऊ देत आणि संपूर्ण विश्वात भारताचे नाव सुवर्ण अक्षरांनी झळकू दे आणि संपूर्ण विश्वात हे शब्द दुमदुमू दे.

# प्रस्तावना

दूरदर्शन वर विष्णुपुराण पहात असताना खूप दिवस मनात असलेला विषय पोरस चे चरित्र सुरेखाताईंना या विषयावर लिहावेसे वाटले दीड वर्षांच्या लॉकडाऊन च्या काळात सुरेखाताई ने टप्प्याटप्प्याने हा विषय लिहून व्हाट्सएपच्या माध्यमातून सर्वान पर्यंत पोचवला लॉकडाऊनचा काळ त्यांनी या लेखनात सार्थकी लावला स्वतः सुरेखाताई म्हणतात त्यांचे वडील पोलिस खात्यात नोकरीला असल्याने त्यांचे ते शिस्तबद्ध जीवन आणि त्यांच्या रुबाबदारपणा त्याचा परिणाम त्यांच्या मुलांवर झाला. सुमारे २५०० वर्षांपूर्वीचा काळ आहे त्या काळातला वीर योद्धा झेलम नदीचा लाडका पुत्र पुरुषोत्तम पोरस ज्याने अलेक्झांडरला आपल्या मायदेशातून रिकाम्या हाताने मॅसेडोनियाला पाठवले त्या शूर पुत्र याबद्दलचा हा इतिहास.

सुरेखाताई त्यांच्या नातवाने याला पोरस पुराण म्हंटले ते योग्यच आहे कारण अडीच हजार वर्षांचा हा काळ आहे. पुराण काळ नसला तरी अगदी आधुनिक काळ पण नव्हे हा आर्य चाणक्य यांचा शिष्य आहे समर्थ गुरूंचा हा समर्थ शिष्य आहे या समर्थ शिष्या चा इतिहास मला आवडला तुम्हाला पण आवडेल. सुरेखाताई नवनवीन विषयावर लेखन करण्याच्या तुमच्या उपक्रमाचे मला कौतुक वाटते पुस्तकरूपाने पोरस पुराण प्रसिद्ध होत असताना त्याला वाचकांचा उत्तम प्रतिसाद लाभेल यात शंका नाही.

**श्रीमती प्रतिभा विवेक बिवलकर.**
आर.एच. - ७६, जय श्री राम ऑर्किड,
एम.आय. डी. सी. डोंबिवली पूर्व
मो. : ७०४५४००८८२.

# पोरसपुराण

श्री गणेशा. रसिकहो इसवी सन ३१२. ३१३ ह्या काळात सुमारे २५०० वर्षांपूर्वी सोळा-सतरा जनपद भारतात होते. ह्यालाच अखंड भारत असे म्हणत. आपली मातृभूमी भारत माता सुजलाम-सुफलाम तर होतीच, परंतु ह्या देशावर खूप वेळा परकीय आक्रमण झाले. आपल्या देशातील चांगल्या संस्कारामुळे कोणी भारतीय डगमगले नाहीत. आता मी वीर योद्धा झेलम नदीचा लाडका पुत्र पुरुषोत्तम पोरस ह्या वीर योद्धयाबद्दल सांगणार आहे. ज्याने स्वतःला देव मानणाऱ्या, अलेक्झांडरला आपल्या मायदेशातून परत रिकाम्या हाताने मॅसेडोनियाला पाठविले त्या शूर वाघाबद्दल,सांगणार आहे.

झेलम नदीच्या तीरावर दिमाखाने मिरवत असलेले पौरव राष्ट्र आणि तक्षशिला हे होत. पौरव राष्ट्र सुख, समृद्धी, ऐश्वर्याने नटलेले होते. इंद्राच्या दरबारासाराखे शोभणारे. तिथले सर्व नागरिक आनंदी समाधानी होते. आणि आता तरी आनंदाला उधाण आले होते, कारणच तसे होते की दर वर्षी दोन्हीकडच्या राज्यांमध्ये शर्यती असायच्या. आता ते दिवस जवळ येत असल्याने प्रत्येक नागरिक मन लावून काम करण्यात गुंतलेला होता, कोणी समूहनृत्याची तयारी करत होते, काही ठिकाणी तलवारबाजी करणे, गायनाची तयारी चालु होती, कोणीची सुंदर-सुंदर पोशाखांची तयारी चालली होती. कोणी दागिन्यांची घडणावळ करत होते. पौरव राष्ट्राचा रंग निळा होता आणि तक्षशीलेचा रंग तपकिरी होता. बमनी राजे यांचे ज्येष्ठ भाऊ शिवदत्त हे अमात्य होते. रिपूदमन हे राष्ट्राचे सेनापती होते. बमनीराजे शूर वीर योद्धे होते. परंतु स्वभावाने प्रेमळ असे होते. शिवदत्त छंदी रागीट वृत्तीचे होते.

# तक्षशिला

तक्षशिलेची राजकुमारी अनसूया आणि राजकुमार अंभिराजा हे दोघे भाऊ बहीण होते. अंभिराजा धूर्त कपटी असे होते अनसूया प्रेमळ सुंदर शूर वीर योद्धा  होती. ती नेहमीच भावा बरोबर असे. पौरव राष्ट्र आणि तक्षशिला ह्या दोन्ही राष्ट्रांमध्ये वैर भाव होते. तरीपण वार्षिक उत्सव, स्पर्धा, ह्यामध्ये खंड नसे. तसेच व्यापार करण्यासाठी बाहेरच्या देशातील व्यापारी जनांना आमंत्रण करत असत. चीन देश हे नीलम रत्ना साठी प्रसिद्ध होते. पारस हे काचेचे सामान, सुंदर सुंदर झुंबर, आणि वस्त्रा साठी प्रसिद्ध होते. सुदान देश तांबे पितळ धातु साठी प्रसिद्ध होते. या सर्वांच्या स्वागतासाठी पौरवराष्ट्राची लाडकी झेलम नदी होती. तिचा तट सुंदर सजवून स्वागत करण्याची पद्धत होती. हे दृश्य पाहताना मनमोहक दिसत होतेच, शिवाय जहाजांची ये जा पाहणाऱ्यांच्या नजरेला नेत्रसुख देत असे. पौरव राष्ट्र आणि तक्षशिला या दोघांमध्ये पाण्यातील शर्यती व जहाजावरील वेगवेगळ्या शर्यती असायच्या. सहाजिकच चुरस पाहण्यासाठी पौरवजन आणि तक्षशिलेच्या नागरिकांची झुंबड उडायची या स्पर्धेमध्ये राजा बमनी आणि अंभिराज दोघेही उतरले होते. जहाजावरील अटीतटीच्या सामन्यात पौरव राष्ट्र विजयी ठरले. त्यानंतर राज्यसभेत एकत्र जमून विजयोत्सवाचा समारंभ असायचा, व व्यापारी जनांचा मेळावा असायचा. तसेच प्रत्येक राष्ट्र, प्रत्येक राष्ट्रातून आलेले पदार्थ, कापड सर्व प्रदर्शन मांडून बोली लावत असत. शिवदत्त पुढाकार घेऊन सर्व काही पहात होते. बोली झाल्यानंतर अचानक एक व्यक्ती सभेमध्ये लक्ष वेधून घेत प्रासादात प्रवेश करत मी पण आलो आहे असे म्हणत आली. सर्वांचे लक्ष त्याच्या बोलण्याकडे गेले. त्या व्यक्तीच्या अंगात उंचीचा डगला त्यावर जाकीट डोक्यावर पारसी शिरपेच आणि धूर्त नजर होती. त्याने प्रासादात राज सिंहासनाच्या समोर येऊन राजांना मुजरा केला,

हे शिवदत्तला जरा खटकले आणि ते म्हणाले ह्या वर्षाची बोली संपली आहे तुम्ही  पुढच्या वर्षी या. परंतु बमनी राजांनी त्याला मान्यता दिली. पण हे अनसूयाला आवडले नव्हते त्या स्पष्टच बोलल्या अशी माणसं धूर्त असतात. नंतर सर्वानुमते पारसला व्यापार करण्यासाठी पौरव राष्ट्रात प्रवेश मिळाला. पारसी पौरव राष्ट्र काबीज करण्याच्या हेतूनेच आला होता.

व्यापार करण्यासाठी बाहेरून आलेले सर्वजण परत आपल्या मायदेशी निघून गेले. परंतु पारसचा डरायस तळ ठोकून पौरवराष्ट्रातच राहिला. तिकडे वार्षिक उत्सवासाठी आलेल्या तक्षशिलेच्या नरेश अंभिराज आणि त्याची बहिण अनुसया हिला आपल्या मायभूमीला परत जाताना अमात्य शिवदत्त यांच्या मनात घातपात घडवून आणायचा विचार होता. त्यासाठी त्याने पौरव ते तक्षशिला पर्यंत सुरुंग पेरले होते, घोड्यांच्या टापानी सुरुंग फुटून तक्षशिलेचे सैन्य, राजा, राजकुमारी जखमी झाले, त्यामुळे दोघांमध्ये युद्ध पेटले. अनुसुयाच्या मनात होते, दोन्ही जवळ जवळच्या राजानी एकत्र येऊन बाहेरून होणाऱ्या आक्रमणाला सामोरे जावे .तिकडे वेगळेच चित्र दिसत होते. तिने हात जोडून बमनी राजांना विनंती केली की हे सर्व थांबवा.

त्या युद्धभूमी वरच बमनी राजानी अनसूयेला मागणी घातली. तक्षशिलेची राजकुमारी अनसूया हिने अगदी मनापासून पौरव राष्ट्राचे महाराणी पद स्वीकारले. दोन्हीकडच्या ज्येष्ठ भावांना शिवदत्त आणि अंभि राजाला हे मान्य नव्हते. महाराज बमनी आणि अनुसुया दोघानी दृढनिश्चयाने एकमेकांना वरमाला घातली आणि विवाहबद्ध झाले. दोघांच्याही मनात हीच इच्छा होती की वैरपणा संपून सलोख्याने वागतील. पौरव राष्ट्रात महाराणी अनुसुयेचे खूप आनंदात उत्साहात स्वागत झाले. नगरातले सर्व नटून सजून वाद्यांच्या गजरात संपूर्ण राष्ट्र न्हाऊन निघाले होते, सगळीकडे आनंद

ओसंडून वाहत होता. खूप वर्षापासून पाहत असलेले अनुसुयेच्या मनातील सुंदर स्वप्न सत्यात उतरले होते. त्या सुंदर क्षणातच ती रमलेली असता शयनकक्षात बाणांचा वर्षाव होत होता. त्या आवाजाने जागी होऊन पहाते तर तिच्या शय्येवर बाण होते. आणि महाराज पण कक्षात नव्हते. तिने स्वतःला सावरून कक्षाबाहेर येऊन पाहिले, तर अमात्य शिवदत्त रागातच ओरडले तू इथे का आलीस? तक्षशिला आणि आमचे वैर आहे. मागील अपमानाचा बदला घेण्यासाठी बमनी राजाने तुझ्याशी विवाह केलाय. अनसूयेला मोठ्या दीरांचे बोलणे शल्यासारखे टोचले. बाहेर येऊन बमनी महाराजांचा शोध घेतल्यावर महाराज झेलम नदीत सूर्याला अर्घ्य देत असलेले तिला दिसले. तिला हायसे वाटल्यावर तिने त्यांच्या जवळ जाऊन विचारल्यावर सारं काही सत्य समोर आले, महाराणीला खूप वाईट वाटले कारण तिने खरंच मनापासून बमनी महाराजांशी  विवाह केला होता.

महाराजानी तिला तक्षशिलेला जा म्हणून सांगितल्यावर ती वाघीणी सारखी बनली, ती झेलम नदीला आईच मानत होती. ती आपल्या मनातले सारे आईला सांगत असे. अनुसया आता मला मार्ग दाखव म्हणून हात जोडून उभी राहिली. अनसूया स्वतः शूर वीर योद्धा होती. युद्धातले सर्व डावपेच तिला माहित होते. थोडा विचार करत नदीकाठी बसली होती. इथे दोघांमध्ये तिसऱ्याचा लाभ म्हणीप्रमाणे डरायस सर्व काही पाहत होता. तो अनसूयेला बघून म्हणाला, तुम्ही आमच्याबरोबर पारसला या. तक्षशिला आणि पारस दोघे मिळून पौरव राष्ट्रावर आक्रमण करूया. डरायसचे बोलणे ऐकून अनसूया थक्क झाली. ज्या महाराजांनी व्यापार करण्यासाठी त्याला पौरव राष्ट्रात राहण्याची अनुमती दिली, त्या राष्ट्रावरच हा कुरघोडी करणार असे तिच्या मनात आले .अनसूयाने झेलमच्या तटावरुन राजमहालात येऊन सर्व काही महाराजांना सांगितले. आणि स्पष्ट शब्दात हे पण सांगितले की मी माहेरी जाणार नाही मला मारून टाकले तरी चालेल. तेव्हा बमनी

महाराजांनी पश्चात्ताप होऊन तिची माफी मागितली. अनसूयाने महाराजांना आणि अमात्य शिवदत्तना सांगितले की आपण सारे एकवटून पारसीला परत पारस ला पाठवूया ,त्या तिघांच्या प्रयत्नाला यश आले. धूर्त डरायस आणि त्याचा सहाय्यक मोशेस पारसला जाता जाता म्हणाले, आम्ही पौरव राष्ट्रावर राज्य करूनच दाखवू.

# मॅसेडोनिया

रसिकहो, आता आपण मॅसेडोनिया ला जाऊया. पौरव राष्ट्राचा पुरुषोत्तम, पुरु, त्याचा प्रतिस्पर्धी अलेक्झांडर त्यांच्याबद्दल जाणून घेऊ. फिलिप आणि ओलंपिया मॅसेडोनियाचे राजा राणी. फिलिप खूप शूर वीर योद्धा होता.

ओलंपियाच्या पोटी अलेक्झांडरचा जन्म झाला. फिलिप ग्रीस देश जिंकून ओलंपियाला राणी म्हणून मेसोडेनियाला घेऊन आला, हे सर्व तिच्या मनाविरुद्ध घडलेले होते. फिलिपने तिच्या मनाविरुद्ध तिचा उपभोग घेतला. म्हणून तिने रागाने जिझस च्या चर्चमध्ये जाऊन येशूला साकडे घातले की मला असा पुत्र दे की तो संपूर्ण विश्व जिंकून माझ्या पाया वर घालू दे. तिला बऱ्याच मांत्रिक विद्या अवगत होत्या. ओलंपिया गर्भवती असताना सर्वांना सांगत असे माझ्या पोटात देवाचा पुत्र वाढतो आहे.

रसिकहो पोरस आणि अलेक्झांडर ह्या दोघांचे जन्म एकाच वेळी होणार आणि ते एकमेकांचे शत्रू असणार असे मॅसेडोनियाच्या गुरुनी वर्तवलेले होते. इकडे महाराणी अनुसुयाच्या आनंदाला पण पारावार राहिला नाही, तिच्या गर्भात शूर वीर प्रेमळ गर्भ वाढत होता. राजपुरोहितानी वर्तवले होते की तुम्हाला मुलगा होणार त्याचे नाव प वरून असणार ,त्याचे नाव पुरुषोत्तम असे ठेवा. त्यांनी बाळाची सुंदर लक्षणे ही सांगितली. राजाराणी दोघानी प्रसन्न मुद्रेने राजगुरूंना वंदन करून आशिष घेतले.

पौरवराष्ट्राची महाराणी अनसुया हिच्या मनात आले की आपण माहेरी जाऊन भाऊ भावजयीला आनंदाची बातमी देऊया. ती खूप आनंदात होती. साऱ्या जणांनी एकत्र जाण्याचा विचार महाराजांना सांगितला. पूर्वीच्या प्रथेप्रमाणे महाराज बमनीनी तक्षशिले च्या राजाला संदेश पाठविला आणि छत्र चामर, सैन्यदल, घोडदळ सर्व लवाजम्यासह तक्षशिलेला जाण्याची तयारी केली. तिकडे तक्षशीलेचे महाराज अंभिराज यांच्या मनात शत्रु राष्ट्राची माणसं आपल्याकडे येणार आहेत म्हणून सैन्यदल सज्ज ठेवण्यास सांगितले.

अनसूयेच्या मनात कौटुंबिक भेट घ्यायची होती. या उद्देशाने अनुसया आणि कुटुंबीय आलेले होते परंतु भावाच्या ओठात एक पोटात एक म्हणीप्रमाणे भाऊ अंभिराजने खोटं स्वागत केले. महाराणी अलका आणि अंभी राजाचा अंभीकुमारनी मात्र खूप छान अनसूयेचे स्वागत केले. बाळाशी खेळता-खेळता अनुसुयेचे लक्ष एका माणसावर गेले, तर तो डरायस होता. भावाने त्याला आश्रय दिल्याचे पाहून अनसूयेला खूप वाईट वाटले. एवढेच नाही तर भावाने क्रूरपणाने बमनी महाराज आणि शिवदत्त यांना संपवण्याचा विडा उचलला होता, हेही समजले. अनसूया ज्या आनंदाने आली होती तो आनंद मावळून त्याची जागा सूडाने घेतली होती. तिचे बाळंतपणाचे दिवस भरत आले होते, परंतु त्यावेळी झालेल्या लढाईत अनुसया तलवार हातात घेऊन लढत होती रिपूदमन राष्ट्राचे सेनापति तिच्या मदतीला होते .

धूर्त डरायस आणि अंभिराज एकत्र येऊन पौरव राष्ट्र बळकावण्याचे स्वप्न पाहात होते. परंतु नियतीला ते मान्य नव्हते. कारण अनसूयेच्या पोटी झेलम आईचा वीर बछडा जन्माला येणार होता. तक्षशिला हे महाराणीचे माहेर, तिथे जोरात युद्ध सुरु झाले, त्यावेळी सेनापती रिपूदमन राणीला रथात बसून तिथून सुसाट वेगाने रथ पळवीत निघाले. बमनी महाराज बेशुद्ध

होते. अमात्य शिवदत्त महाराजाना घेऊन राजवैद्याकडे सोपवून, अनसूयेला मारण्यासाठी पाठलाग करत होते. तिच्यामुळे आजचा हा प्रसंग ओढवला म्हणून अनसूया वर अमात्यांचा राग होता. महाराणीचे हितचिंतक फक्त रिपुदमन एकटेच होते. ते जिवाचा आकांत करून महाराणीला आणि येणाऱ्या राजकुमाराला वाचवण्यासाठी धडपडत होते. रथ सुसाट वेगाने चालवताना एक मोठी विहीर दिसली, तेंव्हा सेनापतीनी तिथे रथ थांबविला. आजूबाजूच्या वेली एकत्र करून अनसूयेच्या कमरेला बांधून तिला विहिरीत सोडत होते. तेवढ्यात पौरव सैन्य अमात्य, डरायस, सर्वजण अनसूयेला शोधत तेथे आले. त्या सर्वांबरोबर एकटे सेनापती लढत होते.

तिकडे मॅसेडोनिया देशात जिझस बाळाचा जन्म होणार म्हणून सारा महाल दिव्याने सजविला होता. सिकंदरचा जन्म झाल्यावर फिलिप आणि ओलंपिया खूप आनंदी झाले. इकडे भारत मातेच्या वीर पुत्राचा जन्म त्या विहिरीत झाला. त्यात धो धो पाऊस पडत होता महाराणी अनसूयेच्या डोळ्यात आसूं आणि हसूं दोन्ही होते. रिपूदमनना त्या विहिरी तून बाळाच्या रडण्याचा आवाज येत होता. रिपू दमन सर्वांशी लढून जखमी झाले होते. तरीपण महाराणी आणि राजकुमारला वाचवण्याचे काम ते करत होते. शिवदत्त आणि डरायस दोघानीही पौरव राष्ट्राचा नाश करायचे ठरवले होते. त्यानी त्या विहिरीतून अनसूया आणि बाळाला बाहेर काढून झेलम नदीच्या धबधब्यावरून खाली ढकलले. सेनापती रिपूदमनने शुद्धीवर आल्यावर धबधब्याच्या डोहात जाऊन बाळाला वाचविले. जिवीत बाळ पाहून त्यांना खूप आनंद झाला, त्यांनी बाळाचे पटापट मुके घेतले. पण अनसूयेचा काहीच पत्ता लागला नाही.

शिवदत्तनी पौरव राष्ट्रात येऊन बमनी महाराजांना खोटी वार्ता दिली. अनसूयाने बाळाला घेऊन झेलम नदीत जीव दिला. आणि रिपू दमन

पण जिवंत नाहीत. महाराज बमनीना आपल्या ज्येष्ठ बंधूचे बोलणे खरे वाटले.

मॅसेडोनियाचा राजकुमार अलेक्झांडरला जन्मल्यापासूनच त्याची आई ओलंपिया, भारत देशाचा नकाशा दाखवून सांगत होती की तू मोठा झाल्यावर संपूर्ण जग जिंकून माझ्या पायावर घाल. आणि भारतावर राज्य कर. राजा फिलीप वीर योद्धा होता. त्याबरोबरच क्रूर आणि विध्वंसक वृत्तीचा होता. ऑलिंपिया मंत्र तंत्र करण्यात अग्रेसर होती. तिला कोणाबद्दल दया माया काहीच नव्हती .

झेलम आईच्या वीर पुत्राला, अनुसयाच्या बाळाला रिपू दमन, पुरू म्हणून हाक मारत असत. आता सेनापती रिपूदमन वर मोठे संकट आले होते. बाळाला पौरव राजाच्या हाती सोपवावे, तर डरायस आणि शिवदत्त दोघे मिळून बाळाला मारून टाकतील. कारण शिवदत्तला तक्षशिलेचा नातू नको होता. बमनी महाराज राष्ट्राचा कारभार आणि व्यापारीकरण वाढवण्याच्या मागे होते. म्हणून रिपूदमनने बाळाला घेऊन पौरव राष्ट्र सोडण्याचा विचार केला आणि सेनापती रिपूदमन यांची भार्या पृथा आणि मुलगा हस्ती यांना घेऊन ते झेलमच्या तटावर पोचले.

सेनापती रिपुदमनचा शोध घेण्यासाठी, पौरव राष्ट्रात सगळीकडेच कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. हे त्याला कळल्यावर चेहरा लपवून त्यांनी आपल्या भार्येला सांगितले की दिसेल त्या जहाजात जाऊन बस. मी परवानगीची चिठ्ठी घेऊन येतोच. चिठ्ठी घेऊन जहाजात येईपर्यंत शिवदत्तच्या सेनापती समरसिंग याने रिपूदमनवर हल्ला केला. रिपूदमनने बाळाला बायकोकडे सुपूर्द करून समरसिंग बरोबर दोन हात केले. तेवढ्यात तिथे लढवय्ये जमातीचे (दस्स्यूंचे) आगमन झाले. या जमातीत स्त्रिया पण खूपच शूरवीर असतात. राणी महानंदा ने पुढाकार घेऊन रिपूदमन च्या

कुटुंबाला आश्रय दिला. तेव्हा रिपूदमनने आपले नाव बदलून सज्जनसिंग असे सांगितले. हे सर्व पौरव राष्ट्राच्या राजकुमाराला संरक्षण देण्यासाठी त्यांना करावे लागले. रिपूदमन सारखे  सेनापती होते म्हणूनच पुरू सुरक्षित राहिला. या सर्व कामात रिपुदमन ची बायको पृथाचा पण खूप मोठा सहभाग होता .

दस्यू लोकांची खासियत म्हणजे, लुटमार करणे पक्षांचे आवाज काढून आपल्या माणसांना बोलवणे, पाण्यात श्वास रोखून बराच वेळ पोहणे, ही होती. दस्यू ही वस्ती, झेलम नदीवरच लाकडाची घरे बांधून राहत होती. पौरव राष्ट्राचे सेनापती रिपूदमन, सज्जनसिंग या नावाने दस्स्यू राजाचे सेनापती बनले. तिथले राजा राणी आणि त्यांची दोन मुलं, सुमेर आणि लाची हे होत. पुरू, हस्ती, सुमेर आणि लाची हे चौघेही वयाने सारखेच होते. सर्वात लहान लाची होती. ही खूप चाणाक्ष, तेजस्वी मुखडा असलेली होती. चौघेजण अगदी सारखीच दिसत होते. पूरुवर सज्जनसिंग पोटच्या मुला पेक्षा जास्त प्रेम करत होते. पुरू पण खूप प्रेमळ देखणा शूरवीर होता. सज्जन सिंग त्या सर्व मुलांना युद्धाचे डावपेच शिकवत असत. अचानक समोर शत्रू आला तर त्याच्याशी कसे दोन हात करावे, धनुष्यबाण, बर्ची चालवणे, झाडावर चढणे, पटापट पाण्यावर पूल बांधणे हे सर्व शिकवत आणि नेहमी मुलांची परीक्षा घेत असत.

ह्या सर्वात पुरू नेहमीच आघाडीवर असायचा. जहाजावरील शिडी चढणे, उतरणे उडी मारणे यामध्ये सर्व मुलं खूप उत्साहाने शिकत. सज्जनसिंगना रोजच वाटे बमनी महाराज आणि पुरू यांची भेट घडवून आणावी. त्यांना सांगावे पौरव राष्ट्राचा राजकुमार सुरक्षित आहे. परंतु नियतीच्या खेळा प्रमाणेच सर्व काही चालते. ही चारही मुलं नेहमीच एकत्र खेळत आणि एकजुटीने काम करत असत. आता चौघेही तारुण्यात पदार्पण

करत होते पुरुचे देखणे रूप अजूनच सुंदर बहरू लागले होते. सज्जन सिंग आणि पृथा यांच्यामध्ये नेहमीच वादावादी होत असे. पुरू राजकुमार आहे हे फक्त त्या दोघांना माहित होते.

पौरव राष्ट्रात अमात्य शिवदत्तानी समरसिंगांची बहिण कनिका बरोबर बमनी राजांचे दुसरे लग्न लावून दिले होते. दुसरा राजकुमार कनिष्क त्याच्या राज्याभिषेकाची तयारी चालू होती. काका शिवदत्त त्याचे खूप लाड करत असत. त्याने हट्टीपणाने पारशी पेहेराव घातला तरी कोणी काहीच बोलत नसे. परंतु महाराणी कनिकाला हे पटत नव्हते. त्यातच पारसी ला येऊन वीस वर्ष झाली होती. हळूहळू डरायस तिथली माहिती गोळा करत होता. त्याला महाराजांचे शत्रू कोण आहेत, आणि मित्र कोण आहेत हे कळत होते .

त्या धूर्त डरायसच्या मनात राजकुमार कनिष्कला जावई करून घेण्याची इच्छा होती. पौरव राष्ट्रावर त्याचे वर्चस्व वाढले होते. तेथील धनसंपत्ती तो आपल्या राष्ट्रात पाठवीत होता. तेवढ्यावरच न थांबता पौरव प्रजेलाही गुलाम बनवण्यासाठी पारसला पाठवीत होता. असेच एके दिवशी मोठ्या जहाजाने निघालेल्या जहाजावर ह्या तिन्ही तरुण वीरांचे लक्ष वेधले. तिघांनी पाण्यात उडी मारून जहाज थांबवले. जहाजावरील मुख्य जो फारुस हा डरायसच्या सेनापतीचा मुलगा होता त्याला पौरव राष्ट्राचे सैनिक फितूर झाले होते. ते सर्व ह्या तीन तरुण वीर पुरू, हस्ती, सुमेर यांच्याशी लढण्यासाठी सज्ज होते. तिघानी सर्वांशी लढून जहाजावरील धन आणि पौरव जनांना दस्यू वस्तीवर आणून त्यांची सुटका केली. परंतु हे सर्व दस्यू राजा राणीला रुचले नाही. त्याला कारण ही तसेच होते. दस्यु ही जमात कोणालाच आपली वस्ती कोठे आहे ते कळू देत नव्हती.

हे जे काही घडले त्याला कारण पुरु होता, त्याला आपल्या

देशाबद्दल राष्ट्राबद्दल स्वाभिमान आणि प्रेम होते. अभिमान त्याच्या धमनी मध्ये होता. त्याच्या मध्ये पौरव राष्ट्राच्या वीर माता-पित्याचे रक्त होते. आता पुरू वीस वर्षांचा झाला होता. त्याला चांगले-वाईट समजत होते. दस्यु राज्यात असे ठरले सर्व बन्दी पौरवाना त्यांच्या राष्ट्रात सोडून यावे. पुरू जरी दस्यू प्रांतात वाढत असला तरी तो रूपाने राजबिंडा दिसत होता.

तिकडे मॅसेडोनियाचा राजा फिलीप दुसऱ्या देशी जंग लढण्यासाठी गेला असता मॅसेडोनिया वर थिसिया देशाने आक्रमण केले. त्यावेळी अलेक्झांडर ने थिसीया बरोबर लढून युद्ध जिंकले. पण फिलीप परत आल्यावर थिसियाच्या सेनापतीला धावणाऱ्या घोड्याच्या मागे बांधून त्याच्या शरीराचा सांगाडा होईतोवर पळवले. सर्वात वाईट गोष्ट होती ही की नाकाला रुमाल लावून बघत उभे राहणाऱ्यांची होती. फिलिपला हेच दाखवायचे होते की जे बघणाऱ्यांचे पण धावणाऱ्या प्रमाणे हाल करणार.

पुरु, हस्ती आणि लाची पौरव राष्ट्रात जाणार असतात त्या रात्री सज्जनसिंग व पृथामध्ये वाद होऊन पुरु पौरव राष्ट्राचा राजकुमार आहे हे सत्य त्याला समजते. पुरु पौरव आहे हे सत्य समजल्यावर पुरू बेचैन झाला. त्यादिवशी एकांतात झेलमच्या तटावरच बसून राहिला. त्याच्या भल्यासाठीच,वयाच्या विसाव्या वर्षापर्यंत हे गुपित ठेवलेले होते. त्या रात्री पूरु न जेवता एकटाच बसलेला पाहून लाची त्याला जेवण घेऊन गेली.

दुसऱ्या दिवशी पूरु, सुमेर यांचे पौरव राष्ट्रात जायचे ठरले. लाचीला ही पुरूचे अखंड भारताचे विचार पटत, म्हणून आणि चांगला मित्र म्हणून पुरू लाचीला आवडत होता, तिने पण त्यांच्याबरोबर पौरव राष्ट्राला जायचं ठरवलं आणि त्यांच्याबरोबर पौरव राष्ट्राला गेली.

दस्यू बद्दल पौरव जनाना द्वेष होता. पुरु खरा कोण आहे हे कोणालाच माहीत नव्हते, तो दिसला की त्याला दस्यू समजून त्याच्यावर

पौरवजन हल्ला करत. दस्यु लोकांचा पेहराव तपकिरी रंगाची घट्ट धोती आणि डोक्याला मुंडासे आणि अंगात अंगरखा असा होता.

इकडे, पारसी आपल्या मुली बरोबर येणार होता. त्याच्या स्वागता साठी झेलमच्या तटावर कडेकोट सुरक्षा होती. बमनी राजाला वाटे सर्व कार्यक्रम सुरळीत पार पडावे. हे तिघे पुरु, सुमेर, लाची, पौरव राष्ट्रात जहाजाने पोचल्यावर तेथील सुरक्षा रक्षकांना पाहून हे सावध झाले अणि आता सुरक्षित कसे पोचावे विचार करत असतानाच, त्यांना चिंतन नावाचा व्यापारी भेटला. तो यांना पाहुन दस्यु म्हणून घाबरला. परंतु पूरूने समजावून सांगितल्यावर त्यांना पौरव राष्ट्रात प्रवेश मिळाला. कनिष्क आणि शिवदत्त तटावरून जातीने लक्ष देत असताना, त्यांना कोणी दस्यू लोक येणार आहेत हे समजले. त्याच वेळेस पुरूची पारसी पेहेराव केलेल्या कनिष्कची भेट होते. पण तिघे वेगवेगळे होऊन उत्सवामध्ये बाहेरून आलेल्या समूहनृत्य करणाऱ्या लोकांमध्ये मिसळले. तरी बऱ्याच सैनिकांची नजर जाताच, सैनिकांनी संशय घेतला जनसमुदायात असलेल्या पूरूकडे बघत आणि हा देखणा आणि शूर युवक कोण आहे ? असे बघे सर्वजण म्हणत होते.

पौरव राष्ट्रात, तिथे असलेल्या पौरव सैनिकात, पारसच्या पण सैनिकांची भर पडली, पुरुला हेच आवडले नव्हते ते लोक भारतीयांचे अपमान करत, हिनास्पद बोलत हे सर्व त्याला पसंत नव्हते. कारण तो स्वाभिमानी युवराज होता. विधिलिखित कोणाचे कसे असते काही कळत नाही. राष्ट्राच्या राजकुमाराला हेच माहिती नव्हते. आपले माता पिता कोण आहेत ? महाराजांना पण आपल्या पहिल्या युवराजा बद्दल माहीत नव्हते. आता पुरू आणि लाची वर मोठे संकट आले ते म्हणजे, बंदी पौरव जनांना सुखरूप त्यांच्या घरी पोचवणे हे होते.

हे तिघेजण म्हणजे पुरु, सुमेर आणि लाची सावधपणे वावरतच काम

करत असता पारस अन्नछत्रात एक स्त्री भीक मागताना त्यांना दिसली. तिच्या अंगावरचे वस्त्र मळलेले होते. लांब केस, ती स्त्री आपल्या कडेवर बाळ असल्यासारखे वावरत होती. बाळाला भूक लागली म्हणून अन्न मागत होती. तिथले सर्व पारसी जण तिला वेडी म्हणून चिडवत होते.  इथे का आलीस असे म्हणून हाकलत होते. हे पाहून पुरुला खूप वाईट वाटले. त्याला काहीच करता येत नव्हते. कारण दस्यु म्हणून बंदी करतील. पण पुरु चांगले काम करण्यासाठी कोणालाच घाबरत नव्हता. त्या स्त्रीच्या जवळ जाऊन तिला दोन्ही हाताने धरून पुरु तिला अन्नछत्रात घेऊन गेला. शूर पणाने सर्वांशी दोन हात करून तिच्या साठी जेवण मागवले. त्या स्त्रीने आधी आपल्या कडेवर असलेल्या खोट्या बाळाला जेवू घातले आणि मग स्वतः जेवली. हात काढले तर आपल्या कडे वरचे बाळ खाली पडेल असे तिला वाटते होते. पौरस राष्ट्रातले लोक पुरुला आता चांगले ओळखत असत. कारण त्याची शौर्याची गाथा बऱ्याच जणांना माहिती होती.

पुरू बरोबर त्या स्त्रीला पाहून सर्व जण घाबरले. ती स्त्रीच महाराणी अनसूया होती. झेलम नदीच्या धबधब्यावरून खाली पडल्याने तिचे मानसिक संतुलन बिघडलेले होते. पुरूचा जन्म झाल्यावर वीस वर्षांनी तिची आणि पुरुची भेट म्हणजे आई आणि मुलाची भेट आताच झाली होती. एकमेकांना भेटल्यावर तिचे मातृवात्सल्य जागे झाले.

बमनी महाराजानी दस्यूना बंदी करण्याचे काम कनिष्कला सोपविले होते, परंतु कनिष्क कामाच्या बाबतीत सक्षम नव्हता. त्याची पुरुशी भेट झाल्यावर स्वाभिमानी पुरुला त्याचा राग आला. पुरुला एवढेच माहिती होते की हा राष्ट्राचा राजकुमार कनिष्क आहे . तो पारसी पेहरावात असतो. त्या दोघांना आपण भाऊ आहोत ते माहीत नव्हते. कनिष्क पुरुशी दोन हात केल्यावर जखमी झाला. आपला मुलगा दस्यूकडून मार खाऊन आला

म्हणून, बमनी महाराजांना खूप वाईट वाटले.

जेव्हापासून पुरू अनसूयेला भेटला होता तेव्हापासून त्या दोघांना एकमेकांबद्दल माया आपुलकी वाटत होती आणि पुरु तिला आई म्हणत होता. तिला आतापर्यंत कोणी आई म्हटलेलं नव्हतं. आई शब्दाने ती मनोमन आनंदित झाली. सर्वांना सांगू लागली मी वेडी नाही आणि पुरुला सांगितले त्या लोकांना अजून मार, अजून मार, आणि असे तिच्या तोंडून ऐकल्यावर पुरूने त्यावर विचार केला. तिने हे पण सांगितले की तू मला सोडून जाऊ नको. तो विचार करतो ही स्त्री कोण असेल? ही अशी का बोलते? ह्या पुरुच्या बाबतीत एक सांगायचं म्हणजे पुरू कुठलेही काम अर्ध्यावर कधीच सोडणारा नव्हता. त्याच्या कामात कितीही अडथळे आले तरी कष्ट सहन करून ते पूर्ण करणारच. काम पूर्ण केल्याशिवाय त्याला चैन पडत नसे.

इकडे कनिष्कला दस्यु पौरव राष्ट्रात आलेले कळताच, दस्युंना मारून टाका अशी आज्ञा तो पौरव सैनिकांना दिली. दोघांमध्ये बाचाबाची झाल्यावर अचानक आग लागली. ते सर्व पाहून अनसूयेची स्मृति परत आली. तिला शिवदत्त, डरायस, सर्वांचे चेहरे डोळ्यासमोर दिसले आणि अनसूयाला हे पाहून ग्लानी आली म्हणून पुरू तिला एका सुरक्षित जागेत ठेवून आला. अमात्य शिवदत्त, पुरू बरोबर अनसूयेला पाहून घाबरला. कारण अनसूया बाळाला घेऊन झेलम नदी मध्ये जीव दिला अशी खोटी वार्ता बमनी महाराजांना शिवदत्त ने सांगितलेली होती. म्हणून काही करून त्याला महाराजांसमोर अनसूया येऊच नये अशी सोय करायची होती.

मॅसेडोनिया मध्ये फिलीपने जग जिंकलेल्या आनंदात समारंभ ठेवला होता, ते थिसीया देशावर आक्रमण करणार होते. आता फिलीप, अलेक्झांडर आणि त्याचा सावत्र भाऊ अरेडीएस दोघांना घेऊन

लढण्यासाठी जाणार होता हे सिकंदरला पटले नाही. सिकंदरची आई त्याला फिलीप बरोबर राहू देत नव्हती. ते दोघेही नेहेमी भांडत असत. फिलिप ने दोन्ही मुला मध्ये शर्यत लावली. पहिल्या डावात दोघेही बलवान ठरले. नंतर दुसऱ्या डावात अलेक्झांडरचा विजय झाला.

पौरव राष्ट्रात वीस वर्षांनी डरायस आपल्या सेनापती मोशीएसला घेऊन आला, येताना आजूबाजूचे सृष्टीसौंदर्य पाहत सांगत होता की ते पहा माझी सोने की चिडिया आ रही है. पाहिलंस किती सुंदर आहे. माझी ही पहिली प्रेमिका आहे. असं पौरव राष्ट्राबद्दल तो सांगत होता. रसिकहो, ह्याला कारण आपणच होतो, व्यापार करण्यासाठी आपण त्यांना बोलावले होते. दिवसेंदिवस पारस इथली अपार संपत्ती नेऊन आपला खजिना भरत होता. बमनी राजांना डरायसने अशी काय भुरळ घातली होती कोण जाणे. त्या व्यापाऱ्याच्या कामावर बमनी महाराज कधी आक्षेप घेत नव्हते. बमनी महाराजानी डरायसचे स्वागत केले. डरायस म्हणाला स्वागत तर अतिथींचे करतात आम्ही तर बरोबर हिस्सेदार आहोत. महाराजांना हे शब्द ऐकून धक्का बसला. त्यांना वीस वर्षापूर्वीचे अनसूयेने वर्तवलेले शब्द आठवले. लगेच महाराज सावरून म्हणाले की हिस्सेदार तर तुम्ही व्यापारीकरणात आहात पौरव राष्ट्रात स्वागताचा मान आमचाच राहणार इथले तुम्ही अतिथी होतात आणि अतिथीच राहणार.

तिकडे पुरुच्या सांगण्यावरून सर्व पौरवजन आणि त्याच्याबरोबर असलेले सर्व जण सुंदर वेशभूषा करून पौरव राष्ट्राच्या प्रांगणात आले. त्या सर्वांना ओळख पत्र घ्यायचे होते. ते सर्व कार्य पार पाडूनच प्रांगणात प्रवेश करताच पारसची राजकुमारी भान हरपून सर्वांकडे बघत होती. तिला सर्वात यक्ष गायनाच्या नृत्याच्या वेषात असलेला पुरु खूप आवडला. डरायसला वाटत होते की आपण बमनी महाराजांना अनुसूया सारखे सहज मातीमोल

करू. कोणालाच माहीत नव्हते की झेलमचा वाघ आणि त्याची आई अनसूया जिवंत आहेत. झेलम आईने तिचे लाडके बाळ आणि बाळाची आई अनुसया याना जीवनदान दिले ही अखंड भारताला दिलेली देणगीच आहे. कदाचित तिला पुढे घडणारा सारा इतिहास माहीत असेल. वीस वर्षात व्यापारी करणासाठी आलेला डरायस आता अधिकारी बनला होता. शिवदत्त च्या मदतीने बरेच वाईट कृत्य चालू होते. हे सर्व पौरव राष्ट्राचे महाराज बमनी याना काहीच ज्ञात नव्हते.

यक्षगायन नृत्यासाठी सजलेले पुरू, सुमेर, लाची, आणि बाकी सर्वजण इतके सुंदर सजले असता पारसच्या सेनापतीचा मुलगा फारुस ने पुरुला निरोप सांगितला की राजकुमारी बार्सिनला तुझी भेट घ्यायची आहे. तिला मुखवट्या मागील चेहरा पाहावा असे वाटतेय.

इकडे झोपलेल्या अनसूयेला सोडून सर्वजण तिथून गेल्यावर तिला जाग येताच पुरू तिला दिसला नाही. त्याला शोधण्यासाठी ती विश्रांती कक्षेतून बाहेर पडली. तिला आता पारसी लोक पण मान देऊ लागले होते. कारण त्या सर्वांनी पुरुच्या हातचा मार खाल्लेला होता. काही जण उत्सवात तिला घेऊन गेले. ती सारखी म्हणत होती, पुरु मला का सोडून गेला?

पुरु आणि सारे नृत्यासाठी वाट पहात असता फारूसच्या सांगण्यावरून महाराज जिथे स्थानापन्न झाले. पूरूने तिकडे जाऊन महाराजांना प्रणाम केला. आम्हाला आशीर्वाद द्या म्हणून त्यांच्या चरणांना स्पर्श केल्यावर महाराजानी पहिल्यांदाच त्याच्याकडे निरखून पाहिले. आणि त्याला म्हणाले की पारशीना आवडेल असेच छान नृत्य करा. हे महाराजांचे बोलणे पुरुला रुचले नाही तो म्हणाला तुम्ही जर माझ्या पाठीशी राहिलात तर संपूर्ण भारताला गर्व वाटेल अशीच कामगिरी बजावेन. हे सर्व ऐकून महाराज अचंबित झाले. यक्ष गायन नृत्य पार पडल्यावर सर्वच आनंदी झाले.

अनसूया राजवाड्याच्या प्रांगणात आल्यावर तिला सर्व आठवले, तेवढ्यात काही दुष्ट पारसी नी तिच्याशी गोड बोलून बंदी बनवले. पुरू आणि लाची पुढील काम करण्यासाठी तटावर येऊन मोठ्या बोटीतून राष्ट्र सोडणार, तेवढ्यात पुरुच्या मनात त्या स्त्रीची आठवण आली. लगेच दोघांनी पाण्यात उडी मारून तिला बंदीतून सोडवण्यासाठी धाव घेतली. फारूस आणि कनिष्क दोघेही तिला मारण्यासाठी धावले. तेवढ्यात पुरू लाची दोघेही त्या महिलेजवळ पोहोचलेले होते.

राजकुमार कनिष्क आणि शिवदत्त नी सैनिकांना आदेश दिला की अनुसयेला बंदी करा. सर्व दस्स्यूनी सर्वांशी दोन हात केले आणि अनसूयेला आपल्या वस्तीत घेऊन जाऊन. तिथे राजा राणी आणि सर्वांपासून अनसुयेला लांब ठेवले.

पुरू आणि लाची ह्या दोघांनाच अनसुयेबद्दल माहित होते. त्यामुळे ते दोघे थोड्या थोड्या वेळाने अनुसयेला भेटायला जात, जेवण पाणी वगैरे घेऊन जात. हस्तीच्या नजरेतून हे सर्व लपले नाही. त्याने खूप रागाने पुरू वर संशय घेऊन अनसुयेच्या खोलीला आग लावली. त्यामुळे अनुसया झोपेतून जागी झाली. हे सर्व पूरु आणि लाचीला समजल्यावर त्या खोलीतून अनुसयेला बाहेर काढले. ती पूर्ण जागी झाल्यावर रिपूना तिने ओळखले. दस्युना हे काहीच माहीत नव्हते. कारण रिपूदमन, सज्जनसिंग या नावाने दस्यु लोकात रहात होते. पुरुला थोडं कळले, रिपूदमन आणि अनसूयेचे काहीतरी नातं असणार. सर्व गोंधळ पाहून दस्यू राजा राणीनी पुरुला अनसूयेला पौरव राष्ट्रात सोडून येण्याची आज्ञा दिली. सज्जन सिंग एक कर्तबगार सेनापती होते. रिपूदमननी आपल्यामुळे दस्युना त्रास किंवा धोका नको म्हणून काहीच ओळख दाखवली नाही.

रिपूदमनना आता राष्ट्राच्या वारस वीर योध्याबद्दल बमनी

महाराजांना भेटून सर्व सांगायचे होते. अनसूयेला पण पाहून त्यांचा आनंद द्विगुणित झाला. अनसूयेबरोबर लाची आणि पुरुला जाण्याची आज्ञा दिली. आणि आपण नंतर जायचे ठरवून घेतलेली जबाबदारी पूर्ण करणार होते. राष्ट्रात दस्यु पकडले जात नाहीत तोपर्यंत सिंहासनावर बसणार नाही म्हणून राजा बमनीनी सिंहासनाचा त्याग केला होता. महाराजानी पुरू आणि त्या स्त्रीला ओझरते पाहिलेले होते. महाराज त्या दोघांबद्दल विचार करू लागले. अमात्य शिवदत्त आणि डरायस दोघेही घाबरले होते. त्या स्त्रीबद्दल बमनी महाराजानी अमात्यांकडे चौकशी केली, तेंव्हा अमात्यांनी असे सांगितले की ती स्त्री एक वेडी बाई आहे. त्या वेड्या स्त्री बद्दल पुरूला का एवढी आपुलकी आहे. आणि तो त्या स्त्रीला का घेऊन गेला असेल, असे महाराज विचार करत होते.

महाराजानी रागाने शिवदत्तना विचारले, तेंव्हा शिवदत्तची बोलणेच बंद झाले. ह्यावेळी महाराजानी खूप सतर्कतेने विचार करून पाऊल उचलले. पुरू आणि लाची नी सर्व बंदी लोकांना मगधला पाठवले. ते दोघे दस्यु राज्यात गेले. पण तिथे सुमेरचा काहीच पत्ता लागला नाही. कारण सुमेरला जाताना एक मौल्यवान हिरा सापडला होता. त्याच्या मागे लागून तो पौरव राष्ट्रात राहिला होता. आणि तिथल्या कडक सुरक्षेमुळे तो बंदी झाला होता. पौरव राष्ट्राचा दूत येऊन दस्युना संदेश देऊन गेल्यावर पुरू आणि लाचीना सुमेर बद्दल समजले. हे लाचीला माहीत होते पण तीने कोणाला सांगितले नाही. परंतु इकडे शिवदत्त आणि डरायस दोघांनी मिळून सुमेरला बंदी बनवून त्याचा छळ सुरू केला होता. कनिष्कचा पण त्यात समावेश होता.

तिघेही एकत्र येऊन सुमेरला पूरुचे ठिकाण विचारून छळत होते. ते असे म्हणत होते की जोपर्यंत पुरुचे ठिकाण सांगत नाही तोपर्यंत तुला

आम्ही असेच त्रास देणार. सुमेर हा दस्यू राणीचा मुलगा होता. त्याला भीती वाटली की ठिकाणाचे नाव सांगितले तर आपल्या दस्यू वस्तीवर आक्रमण करतील म्हणून त्याने काही सांगितले नाही. सुमेरचे आई बाबा सज्जनसिंगला सारखे म्हणत होते की तुम्ही पौरव राष्ट्रात जाऊन सुमेरला लवकरात लवकर आपल्या राज्यात घेऊन या. सज्जन सिंग यांना सुमेरची काळजी वाटली त्यांना पुरुला भेटून सर्व काही पौरव राष्ट्राबद्दल आणि तिथल्या अमात्य, आणि सर्वांबद्दल सांगायचे होते. तेवढ्यात तिथे दस्यू राणीचे आगमन झाले त्यामुळे रिपू काहीच बोलू शकला नाही.

मॅसेडोनिया मध्ये फिलीप आपल्या दोन्ही मुलांना समजावून सांगत, तुम्ही दोघे भांडत राहिलात तर तिसरा माणूस लाभ उठवेल. दोघे भाऊ एकत्र व्हा आणि येणाऱ्या आक्रमणाला सामोरे जा. तुमचा विजय नक्की होईल. अलेक्झांडर डोकं वापरून, बुद्धी वापरून दोन्ही हाताने लढत असे. दुसरा मुलगा अरेडीएस, तो पण मेहनती होता. ह्या युद्धा मध्ये फिलिप घायाळ झाला त्यावेळी दोन्ही मुलानी एकत्र होऊन फिलिपला वाचवले. सगळ्यानीच सिकंदरचा जयजयकार केल्यावर अरेडीएसला वाईट वाटले. अलेक्झांडरला आई वडील दोघांबद्दल आपुलकी होती. ऑलिंपिया ला फक्त आपला मुलगा सुरक्षित आहे ना फिलिपला काही झाले तरी चालेल, असे वाटे. ऑलिंपिया कधीकधी उपाशी राहिली तर अलेक्झांडर जातीने आईकडे लक्ष देऊन तिला जेवण वगैरे देत होता.

डरायस आपल्या लोकांच्या संरक्षणासाठी पारस हून सैन्य मागवणार असे ठरले. पण तसे बमनी महाराजाना नको होते. डरायस पारसी हा नेहमीच पारस कसा श्रेष्ठ आहे हे महाराजांना सांगत असे. आणि नेहमीच पारस आणि पौरव राष्ट्रांमध्ये तुलना करत असे. महाराज चिडून म्हणाले आपण दोन्ही राष्ट्रांमध्ये स्पर्धा ठेवूया कोण श्रेष्ठ ठरतात ते पाहू, पारशीला हे

मान्य होते. महाराज बमनी त्याच्यापुढे प्रस्ताव ठेवला. स्पर्धेमध्ये हरलो तर तुमचा प्रस्ताव मंजूर होईल, तुम्ही हरलात तर पुढे कधीच असे स्पर्धा ठेवायची नाही.

धूर्त डरायस ने सर्व योजना आधीच आखून ठेवली होती, त्याचे सैन्य पौरव राष्ट्राच्या जवळपासच होते हे ऐकून महाराज अवाक् झाले. त्यांना अनसूयेचे शब्द आठवले परंतु कृतीत उतरले नाही.

कनिष्क सुमेरला महाराजांकडे घेऊन जात असता, शिवदत्तनी त्याला अडवून परत बंदिस्त करायला सांगितले. कनिष्कला अमात्य शिवदत्तचे कारनामे माहीत नव्हते. दोन्ही राष्ट्रांमध्ये कोण श्रेष्ठ हे पाहण्यासाठी पारसचे सैनिक, वेगवेगळ्या युद्ध कलेत पारंगत असलेले, वीर स्पर्धक येतच होते. पौरव राष्ट्राचे जनसमुदाय त्यांच्याकडे बघतच राहिला. ह्या राष्ट्रामध्ये पण शूर सैनिकांचे वाण नव्हते.

स्वतः बमनी महाराज सर्वांकडे जातीने लक्ष देत होते. स्पर्धेचे दिवस जवळ आल्याने सगळीकडे नागरिकांच्या उत्साहाला आणि आनंदाला पारावार नव्हता. डरायसने पारशीदेशा कडून जास्तीच अपेक्षा ठेवली होती. तो आपल्या भारत देशाला कमी लेखत होता. कनिष्क पारसी पेहराव परिधान करून इकडे तिकडे वावरत होता. पारस चे योद्धे आडदांड होते. त्यांच्या हातातील शस्त्र अस्त्र राक्षसांना शोभण्यासारखे होते.

पारसची राजकुमारी बारसिन भारतात आल्यापासून सर्व वस्तूना नावे ठेवत होती. पौरव राष्ट्र आणि पारस ह्यामध्ये दोन्ही राष्ट्रांच्या वीर योद्ध्यांची स्पर्धा आयोजित केली होती. दोन्हीकडचे योध्दे जिंकण्यासाठी जय्यत तयारी करीत होते. पारसची राजकन्या आणि कनिष्कची मैत्री झाली होती. तिने कनिष्कला विचारले तुमच्या राष्ट्रात असे आमच्यसारखे उत्तम योद्धे आहेत का? पारशी योध्याना तुम्ही इनाम काय देणार? असे

विचारल्यावर कनिष्क आपल्या बोटातील पौरव राष्ट्राचे प्रतीक असलेली अंगठी द्यायला पुढे जाणार, तेवढ्यात बमनी महाराजांचे लक्ष कनिष्ककडे गेले. महाराजानी कनिष्कला बोलावून अंगठी बद्दल आणि पौरव राष्ट्राबद्दल समजावून सांगितले. आणि हे पण म्हणाले तू पौरव राष्ट्राच्या युवराजाला शोभेल असेच काम कर असे ठासून सांगितले.

स्पर्धा चालू असताना दस्यू राज्यातून पूरु अनसूयेला पौरव राष्ट्रात घेऊन आला तेव्हा सर्व नागरिक राजमहालाच्या प्रांगणाकडे चाललेले पाहून पुरू ने नागरिकांना विचारले. कोणता समारंभ आहे? काय कार्यक्रम आहे? तेव्हां त्याला द्वंद्व युद्धाबद्दल माहिती मिळाली.

पुरू अनसूयेला महालाच्या प्रांगणात घेऊन जाणार होता. पण त्याला त्या स्त्रीबद्दल काहीच माहिती नव्हती. आणि कोणी तिचा अपमान केलेले त्याला आवडत नव्हते. पुरुला सुमेरचा शोध घ्यायचा होता. सुमेर ला कुठे ठेवले असेल म्हणून त्याने विचार केला.

अलेक्झांडर, त्याचे वडील फिलिप कधी युद्ध लढायला तयार होतील ह्याची वाट पहात होता. ह्याला बरेच सावत्र भाऊ होते. सावत्र आया पण असल्यामुळे सर्वांनाच वाटत असे, आपला मुलगाच गादीवर बसावा. ह्या कारणाने एकमेकांविरुद्ध वैमनस्य द्रोह वाढत गेले. त्यातच विषप्रयोग केला गेला, हे सर्व फिलीप जिवंत असताना चाललेले होते.

पौरव राष्ट्रात सगळीकडेच नागरिकांची भाग दौड स्पर्धा पहाण्यासाठी चाललेली होती. दोन्हीकडचे दोन दोन स्पर्धक मैदानात उतरून द्वंद्व युद्धाची सुरुवात झाली. स्पर्धा पाहण्यासाठी राजघराण्यातले सर्व आणि पारसी तसेच नगरवासी, यांची एकच झुंबड उडाली.

पौरव राष्ट्राचे योद्धे जिंकत तेंव्हा भारत जयतू म्हणायचे आणि पारस चे योद्धे जिंकल्यावर पारस, पारस, असे नारा देत होते. पौरव राष्ट्राचे योद्धे

दांडपट्टा खेळण्यात अग्रेसर होते. पारसचे योद्धे दोनदा हारल्यावर तिसऱ्या वेळेला मोशीअचा मुलगा फारुस मैदानात उतरला. पौरस (पुरु) स्पर्धा पाहणाऱ्या जनसमुदायात उभा राहून सर्व काही पाहत होता, तिसऱ्या वेळेला पारस विजयी ठरली. नंतर युवराज कनिष्क आखाड्यात उतरला.

कनिष्क ह्या स्पर्धेत अव्वल ठरला. नंतर पारसचे आडदांड योद्धे वेगवेगळ्या अवजारांचे वापर करून द्वंद्व खेळले. कनिष्कला हार पत्करावी लागली. कनिष्क हारल्यावर पारसच्या सैनिकानी आपल्या देशावरून अपशब्द उच्चारल्यावर पुरुला ते सहन झाले नाही. लगेचच पुरुने पुढे येऊन पारसी योद्‌ध्यांना आव्हान केले, खरे योद्धे असाल तर माझ्याशी लढून दाखवा. आम्ही भारतीय अपमान सहन करणार नाही. एक तर आम्ही आई वरून कोणाचा अपमान करत नाही. कोणी आमच्या आईचा अपमान केल्यावर सहनही करणार नाही. पुरुचे हे बोलणे ऐकून नागरिक आणि महाराजांचा उत्साह वाढला. तिथे जमलेल्या सर्व नागरिकानी पोरस, पोरस, म्हणून घोषणा देऊन त्याला प्रोत्साहन दिले.

जेव्हा पौरव राष्ट्राचे योध्दे, पारसी योद्‌ध्यांन बरोबर द्वंद्व खेळून दमले तेंव्हा पोरस पुढे आला. द्वंद्व खेळण्यासाठी जेव्हा पुरू मैदानात उतरला तेव्हा महाराजांनी त्याला ओळख दे म्हणून आज्ञा केली, त्यावर पुरू सांगितले की मी एक भारतीय आहे. आणि भारतीयांना शरमेने मान खाली घालावी लागेल असे मी कधीच करणार नाही. म्हणून आपली ओळख दिल्यावर महाराजानी त्याला लढण्यासाठी होकार दिला पुरुच्या लढण्याच्या लकबी पाहून महाराज अचंबीत झाले. पारसच्या योध्याना पुरू ने पाणी पाजविले ते पाहून. पौरव राष्ट्राचे सर्व नागरिक आनंदी आणि उत्साही होऊन पोरस, पोरस, म्हणून घोषणा देतच राहिले. शेवटी पुरुचा जय झाला. महाराज, शिवदत्त, आणि सर्व नगर जन खूप आनंदित झाले. ज्याच्या त्याच्या मुखात भारत जय तू

भारत जयतू ह्या  घोषणेने संपूर्ण आसमंत दणाणून गेला.

ऑलिंपिया आणि सिकंदर दोघेही अस्वस्थ मनस्थितीत असतानाच सिकंदरने आईला सावत्र भाऊ अरेडीएस बद्दल माहिती दिली, तिच्या मनात सावत्र मुलाला राजसिंहासना पासून कसे दूर ठेवावे हेच विचार घोळत होते, तिला काळी जादू आणि मांत्रिक विद्या अवगत असलेले अलेक्झांडरला माहित नव्हते.

स्पर्धेत विजय मिळाल्यावर महाराज बमनीनी सभा भरवून पुरुला सभेत येण्याची आज्ञा दिली. पुरू सभेत येत असता शिवदत्त नी त्याला सुमेरकडे घेऊन जा असे सांगितले, पुरुला सुमेरची अवस्था पाहून खूप वाईट वाटले, ह्या सर्वाला तोच स्वतः कारणीभूत झाला होता. त्याने मौल्यवान हिऱ्याच्या मागे लागून स्वतःचे मौल्यवान जीव बंदीगृहात घालवले. शिवदत्तला अनसुया हवी होती. कारण तिला त्याने स्वतः झेलमच्या धबधब्यावरून खाली ढकलेले होते, परत अनसूयेला संपवल्यावर आपल्या चुका झाकल्या जातील असे त्याला वाटत होते. त्याला आपल्या छोट्या भावापुढे आपण किती चांगले आहोत हे दाखवायचे होते. जेव्हापासून अनसूयाने राष्ट्राचे महाराणी पद स्वीकारले तेव्हापासून कपटी शिवदत्त तिला संपवण्याच्या मागे लागलेला होता. नेहमीच शिवदत्त आणि डरायस महाराजांना कुठल्याही कामाचा सुगावा लागू देत नव्हते. इथे महाराजांचा मोठा भाऊच वाईट काम करत होता.

अनसुया सुरक्षागृहातून बाहेर पडल्यावर तिला महालाच्या वरच्या मजल्यावर बंदी गृहात ठेवले होते. ती आता पूर्वीसारखे वेडी भोळी राहिली नव्हती. तिची स्मृती परत येऊन त्या विरांगनेने द्वारपालाना सळो की पळो करून सोडले. रिपूदमन वीस वर्षांनी पौरव राष्ट्रात येणार होते. एक निष्ठावंत सेनापती सहाजिकच त्यांच्या सर्व स्मृती जाग्या झाल्या, सेनापती असावा तर

असा प्रेमळ, त्याग भावना, राष्ट्राच्या वंश वेलीला सांभाळण्यासाठी दस्यु राज्यात जाण्याचा धाडस करणारा, पुरुला तळहाताच्या फोडाप्रमाणे जपणारा, आई बाबांचे प्रेम देणारा, अनसूयाची भेट घडल्यावर आनंदी होणारा रिपू, एवढे वर्ष मनात ठेवलेले गुपित कधी एकदा महाराज आणि महाराणीना सांगू म्हणून उतावीळ झालेला होता. रिपुदमन जिथे अनसूयाला बंदिस्त ठेवलेले होते तिथे, लाचीला घेऊन आले. लाचीला सर्व काही सत्य सांगितल्यावर ते ऐकून तिला खूप आनंद झाला. तिला वाटले आता पुरुचे चांगले दिवस आले म्हणून मनोमन सुखावली.

पुरू महाराजांना भेटण्यासाठी गेला तेव्हा महाराज खूपच रागावलेले होते. सर्व काही सविस्तर सांगितल्यावर ते शांत झाले. तेव्हा पूरु ने त्याना त्या स्त्रीबद्दल सांगितले. तुमच्या राष्ट्रात महिलांना काहीच मानसन्मान देत नाही का? मी बऱ्याच महिन्यापासून पाहतो एक स्त्री वेड्यासारखी फिरत असते आणि पारसी काहीही वाईट शब्द उच्चारतात आणि तिला मारतात. तेंव्हा बमनी महाराजानी आम्ही योग्य ते कारवाई करू म्हणून पुरुला सांगितले. महाराजांचा अमात्यावर खूपच विश्वास होता त्यांचा असा गैरसमज होता की मोठा भाऊ आहे आपल्याबद्दल वाईट असे काहीच करणार नाही.

रिपूदमनचा मुलगा हस्ती पौरव राष्ट्रात आल्यापासून त्याच्या मनात पूरु बद्दल वाईट विचार येत होते. काही करून त्याला संपवावे. त्याच्यामुळेच स्वतःला आणि आई-बाबांना खूप त्रास कष्ट सोसावे लागले. हा विचार सतत त्याच्या मनात येऊन तो पौरव राष्ट्रात आला. लाची, रिपूदमन, पुरू, आणि हस्ती हे सर्व पौरव राष्ट्रात होते. हस्ती ने डरायसची भेट घेऊन पुरू त्याला हा महाराजांचा मुलगा आहे हे सांगितले. आता पारसीच्या मनात दोघांनाही वडिल आणि मुलाला समोरा समोर येऊ द्यायचं नाही असे होते.

शिवदत्तनी पुरु आल्यावर सुमेरला बंदी वासातूंन बाहेर काढले. परंतु पौरव राष्ट्राच्या राजवाड्यात कुठे काय घडतंय हे महाराजांना कळत नव्हते. शिवदत्तनी सुमेरच्या जागी आता पुरुला बंदी केले. आणि एका बाजूला अनसूया पण बंदिस्त होती. पुरू ने ओरडून सांगितले की मला इथून बाहेर काढा, नाहीतर कसे बाहेर पडायचे हे मला चांगलेच माहित आहे. शिवदत्त ने पुरुला बंदीवासातून सोडल्यावर, पुरु अनसूयेचा शोध घेत असताना त्याला बारसिंन भेटली. पुरु तिच्याशी तिच्या वडीलांबद्दल बोलला तुझे बाबा खूप स्वार्थी आहेत. तिला तिच्या बाबांबद्दल सर्व काही माहित होते. परंतु ती त्यांना घाबरत होती. पुरू ने तिला विचारले तू मला मदत करशील का? तर बारसिंन हो म्हणाली, ती पण पारसची वीर कन्या होती, तिने पुरुला द्वंद्व युद्धासाठी आमंत्रित केले.

पुरुशी द्वंद्व खेळताना बारसीन हरली. बारसीन पुरुला मदत करण्यास तयार होते. बमनी महाराज स्वतः ती स्त्री कोण आहे? कुठली आहे? ह्यासाठी उत्सुक होते. अमात्यांनी तिला अशा ठिकाणी ठेवले होते की ती महाराजांच्या दृष्टीस पडू नये. काहीही अपराध नसताना अनसूयेचा छळ चाललेला होता. डरायसच्या मनात पिता-पुत्रांमध्ये कलह लावायचा होता.

बंदीगृहाच्या तिथे जाऊन पाहिल्यावर अनसूयेला महाराज दिसले तेंव्हा त्यांना तिने ओळखले. महाराज तिथून गेल्यावर तिला अमात्याचे सैनिक दुसऱ्या जागेत घेऊन गेले. त्यामुळे बारसीन आणि पुरुची अनसूयेशी भेट झाली नाही. पुरुला वाटले, महाराजानीच तिला बंदी केलेले आहे. पुरु ने चिडून त्यांच्याशी द्वंद्व पुकारले, महाराजांना ह्यातले काहीच माहिती नव्हते ते पण चिडून द्वंद्वाला तयार झाले. दोघेही वीर होते, महाराजानी पुकारा केला की आम्हा दोघांमध्ये कोणीही यायचे नाही. इकडे पिता पुत्रांचे द्वंद चालू

होते. दुसरीकडे अनसुया साठी रिपुदमन आणि लाची शिवदत्तच्या सैनिकांशी लढत असता रिपूदमननी अनसूयेला सांगितले की पुरु तुमचा मुलगा आहे, असे सांगून लढता लढता रिपूदमनना वीरगती प्राप्त होते.

एक सच्चा आणि प्रामाणिक सेनापतीचा शेवट झाला. लाची पुरुला निरोप देण्यासाठी आली तर हे दोघे लढत होते. अनसूया पण हातात तलवार घेऊन सर्वांशी शूरपणाने लढत होती. तिला रिपूनबद्दल खूप वाईट वाटले. कोठडीतून बाहेर आल्यावर अनुसया पाहते तर पिता-पुत्र दोघांमध्ये द्वंद्व चालू होते. अनसूयाने झेलमआईला नमस्कार करून सांगितले की आई दोघांना सुखी ठेव. पुरुला आणि महाराजाना ते दोघे पिता-पुत्र आहेत ते माहित नव्हते. अनसूया बंदीगृहाला मशालीने आग लावून बाहेर पडली. समोर येणाऱ्याशी दोन हात करत जिथे पौरस (पुरु) आणि बमनी लढत होते तिथे येऊन अनुसया ने सांगितले हे द्वंद्व थांबवा, पूरु हा आपला मुलगा आहे. महाराज अनसूया आणि पुरु कडे बघतच राहिले.

महाराजांना आनंद आणि आश्चर्याचा धक्का बसला. वीस वर्षांनी राजकुमार, महाराणी, अनसूया यांची भेट घडली. त्यांचा आनंद ओसंडून वाहत होता. लाचीने धावत पुरूकडे येऊन सर्व सांगितल्यावर पुरू रिपुदमनना भेटायला गेला. पण त्यांच्याशी तो बोलू शकत नाही. आनंद आणि दुःख दोन्ही एकाच वेळेला होते. रिपुदमन आणि पूरु ह्या दोघांचे ऋणानुबंध अगदी पुरू आईच्या पोटात असल्यापासूनचे होते. त्याला जेव्हा समजायला लागलं तेव्हा तो रिपूनाच बाबा म्हणत असे. त्यामुळे त्याला खूप मोठा धक्का बसला होता. तिकडे पुरुला राष्ट्राचा राजकुमार म्हणून आनंद व्यक्त करायचे की रिपू दमन आता हयात नाहीत म्हणून दुःख करायचं असे होते. एका राजनिष्ठ, प्रेमळ, स्वाभिमानी, व्यक्तीकडूनच असे कार्य घडू शकते.

अनसूया आणि पुरू ह्या दोघांचे ध्येय एकच होते. अखंड भारताचे स्वप्न दोघेही पाहत होते. पुरूने अनसूयेला सांगितले की जरी मी राष्ट्राचा राजकुमार असलो तरी रिपू माझे बाबा होते, म्हणून मला दस्यु नगरीत जायला हवे. महाराज बमनीना हे काहीच माहित नव्हते. परंतु सेनापती म्हणून रिपू दमननी पौरव राष्ट्रासाठी आणि राज घराण्यासाठी काय काय बलिदान दिले आहे हे सर्व कौतुकास्पदच असे महाराजाना उद्गार काढतात व त्यांना राजमान्यता देऊन आदराने दस्यु नगरला पाठविले.

हस्ती डरायसचे ऐकून पुरुचा अंत करणार होता. त्याला अशी खोटी वार्ता, मिळालेली होती की बमनी महाराजानी रिपूदमनला मारले आहे. हस्ती आधीच पूरुवर सुडाने पेटलेला होता, तो रागारागाने दस्यु नगरला गेला. पृथा रिपूदमनची भार्या, तिचा पण पूरु वर राग होता. रिपूदमन चे पार्थिव पुरू दस्यू नगरात घेऊन आला. आणि पुढील कार्यासाठी हस्ती येण्याची वाट पाहत होता. हस्तीला यायला वेळ लागला म्हणून पुरूने रिपूदमन च्या देहाला मुखाग्नी दिली. ह्याचा कोणालाही राग आला नाही. पण हस्ती आल्यावर त्याला मात्र राग आणि दुःख अनावर होऊन हस्ती ने पुरुला खूप मारले. पुरु ने मुकाट्याने सर्व सहन केले तेंव्हा लाचीला ही खूप वाईट वाटले आणि दुःख पण झाले. पुरु म्हणाला आम्हा भावांमध्ये तू पडू नकोस.

हस्तीला काही करून पुरुला संपवायचे होते म्हणून हस्तीने पूरुच्या शयनकक्षात जाऊन मागून पुरुवर वार केला. पण पाहतो तर पुरूच्या जागी कनिष्कला तलवार लागली आणि तो खाली कोसळला. पुरु आपल्या कक्षात आल्यावर कनिष्कला खाली कोसळलेला पाहून त्याला वाईट वाटले, कनिष्कला राजवैद्यांकडे सोपवून आणि हस्तीला बाहेर जायला सांगुन पुरु महाराजांकडे गेला. पुरुला हस्तीला वाचवायचे होत म्हणून पुरुने गुन्हा माझ्याकडून घडला आहे असे सांगून गुन्हा स्वतःवर घेतला. महाराजानी

संतापून पुरुला फाशीची शिक्षा ठोठावली. अनसूयेला आपल्या मुलाबद्दल पूर्ण विश्वास होता. पुरू असं काम करणारच नाही. परंतु महाराजांना पूरूकडे पिता म्हणून न पाहता महाराज म्हणून पहावे लागले होते. त्यांनी पुरुला दुष्ट कैद्यासारखी शिक्षा दिली.

आता हस्तीचा पुरूबद्दल गैरसमज होता, तो जाऊन त्याची जागा बंधू प्रेमाने घेतली. त्याला अपराधी असल्याची जाणीव झाली. पुन्हा पौरव राष्ट्रात अनसूयेला पहिल्या महाराणी पदाचा मान परत मिळाला. बमनी महाराज खूप आनंदी झाले. अनसूया ने महाराजांना समजावून सांगितले आपला पुरू असा वागणार नाही महाराजांना खूप वाईट वाटले. आपल्याला बाप म्हणून पुरुसाठी काहीच करता येत नाही. म्हणून ते अस्वस्थ झाले. हे सर्व पाहून डरायसला मनोमनी आनंद झाला. दुसऱ्या दिवशीच पुरुला फाशी देणार त्यावेळी, अनसूया ने पुरुला भेटून सांगितले की पुरू तू खरं बोल तुझ्या भावाला वाचवण्यासाठी तू शिक्षा भोगू नकोस आणि कळकळीने हे पण सांगितले तुला अखंड भारतासाठी लढून वीरगती प्राप्त झाली असती तरी मला दुःख झाले नसते तितके आता दुःख होतेय परंतु आता तू खरे बोल.

ज्या दिवशी पुरू ला फाशी देणार होते त्यादिवशी पुरू जोरातच किंचाळला तो म्हणाला. देशद्रोही म्हणजे कसे असतात ते मी आज सर्वांनाच दाखवणार आहे म्हणून दोन्ही हाताच्या बेड्या तोडून सैनिकांशी लढत राहिला. तेवढ्यात तिथे लाची आणि तक्षशीलेचा राजकुमार अंभी कुमारनी येऊन सैनिकांशी दोन हात केले. अंभी कुमार हा भिल्ल विद्येत प्रवीण होता.

पूरु आणि लाची दोघेही पारसी सैनिकांना मारत असता अनसुया पण त्यांना सामील झाली. अनसूया ने महाराजांना सांगितले आपले शत्रू दस्यु लोकं नाहीत पण महाराजांना पटत नव्हते. पुरू लाची यांनी तक्षशिला

येथे जाऊन महाराज आंभीराजांकडे सैन्याची मदत मागितली परंतु अंभिराजांनी पुरूकडून कडून वेगवेगळ्या परीक्षा घेतल्या.

पुरुला लक्षात आले की आता युद्ध पेटणार म्हणून सैन्य लवकरात लवकर पौरव राष्ट्रात पोहोचावे ह्या साठी झेलम नदी वर पूल बांधावे लागणार होते ते पण काम पुरु ने केले. नंतर लाची आणि पुरु दोघे पौरव राष्ट्रात परतले. महाराणी अनसूया चे लक्ष सर्व ठिकाणी होते तिला तक्षशिला आक्रमण करणार हे कळल्यावर ती अस्वस्थ झाली तक्षशिला आणि पारस दोघांनी मिळून पौरव राष्ट्रावर आक्रमण केले तेव्हा अनसूयाने आपल्या मोठ्या दिरांना बंदी गृहातून  बाहेर काढले कारण ते खूप शूर होते. पुरुला डरायस ने पौरव राष्ट्राचे धन कुठे तरी लपून ठेवले आहे ते माहिती होते ते पण तो शोधून पौरव राष्ट्रात घेऊन आला.

पारस ने दोघांना लढायला लावून बघ्याची भूमिका घेतली. पुरुला ह्याचे खूप वाईट वाटले की आपल्या देशातील सैनिक आपल्याच देशाच्या माणसांबरोबर लढत आहेत. पुरू उंच ठिकाणी जाऊन मोठमोठ्याने टाळ्या वाजवत म्हणाला वा! वा! खूप छान चाललंय आपल्या देशातील सैनिक आपल्या च माणसांना मारत आहेत. तेव्हा सर्व सैनिकांनी शांत होऊन पुरुचे बोलणे ऐकले, त्यांची चूक त्यांना समजली. लगेच तक्षशिला पौरव आणि दस्यू एकत्र होऊन पारसी सैनिकांशी लढले तेव्हा डरायस मान खाली घालून शांत राहिला आणि राजकुमारी बारसिनने पौरव राष्ट्रातील शस्त्र जिथे डरायस ने लपवलेली होती ती सर्व शस्त्रे, पौरव राष्ट्राला अर्पण केली. तिला पुरुचे वागणे खरे बोलणे आवडत होते. ह्या सर्वांचा डरायसला खूप मानसिक त्रास झाला. पूरु अधून मधून दस्यु राज्यात जात असे. त्याला आता जन्मदात्री आई मिळाल्यावर तिला सोडुन कुठे जावसं वाटतं नव्हतं.

इकडे सिकंदर आणि त्यांचे लढवय्ये सिपाही सर्वजण एकत्र येऊन

सैनिकांशी वार्तालाप करताना सिकंदरला वाटले, फिलिप त्याला नेतृत्व पद सोपवेल. परंतु तसे होत नाही लोभी फिलिपने पारसवर आक्रमण करण्यासाठी जायचे ठरवले. सिकंदर ला मॅसेडोनियाच्या संरक्षणाचे काम सोपवले. परंतु हे त्याला मान्य नव्हते. ऑलिंपिया फिलिपला चांगली ओळखत होती, ती सिकंदरला फिलिपच्या बरोबर जाऊ देत नाही कारण फिलिपचा काही, काही स्वभाव ओलिंपियाला आवडत नव्हता.

पुरुला बमनी महाराजांबद्दल प्रेम आपुलकी वाटत नव्हती, कारण वीस वर्षापासून महाराणी, आपलं बाळ, सेनापती सज्जनसिंग, (रिपुदमन) याचा बमनी महाराजांनी काहीच शोध घेतलेला नव्हता. पारसी सगळीकडूनच पौरव राष्ट्राला नेस्तनाबूत करण्याचा विचार करत होते. पारसीने आपल्या सैन्याला पौरव राष्ट्राचा पोशाख घालून दस्युंवर वर आक्रमण करायला सांगितले. दस्युचा असा गैरसमज झाला की पौरव राष्ट्राने त्यांच्यावरती आक्रमण केले आहे. हे सर्व पुरू मुळे घडतंय असे ही दस्युंना वाटले.

तिकडे कनिष्कला राज्याभिषेक करायचा ठरला होता आणि कनिष्क चा साखरपुडा पारसच्या राजकुमारी बरोबर करायचे ठरले होते. महाराणी अनसूया आणि पुरुच्या येण्याने हे सर्व कार्यक्रम पुढे ढकलले गेले होते. ह्यामुळे शिवदत्त आणि कनिष्क दोघेही अनसूया व पुरू वर नाराज होते. पुरुला वाटत होते, आपण दस्यु नगरीत एकत्र राहावे. त्याने तिला दस्स्यू राज्यात बोलावले. परंतु महाराणी अनसूयाला हे शक्य नव्हते, आता ती पौरव राष्ट्राची महाराणी होती. केवळ पुरुची आई नव्हती. पुरुषोत्तम हा पहिला राजकुमार म्हणून त्याला राज्याभिषेक करण्याचे ठरले हे पुरुला मान्य नव्हते. त्याच्या आणि अनसूया दोघांच्या मनात होते की सर्वांनी सलोख्याने वागून पारसीला परत पाठवावे राष्ट्रातील नागरिकांना सुखी आनंदी ठेवावे

आणि अखंड भारत करावे त्या दोघांचे स्वप्न होते. पुरू बमनीमहाराजांना महाराज अस म्हणत असे, म्हणून ते आनंदी नव्हते. अनसूया ने त्याला थोडा वेळ द्या म्हणून सर्व समजावून सांगितले .

दस्युनवर आक्रमण केल्यावर ते सर्वांनी असे ठरवले पौरव राष्ट्रावर धाड घालून सर्वकाही लुटावे ह्यातले पुरुला काहीच माहीत नव्हते. लाचीला हे समजल्यावर तिला खूप दुःख होते तिचा पुरूवर विश्वास होता तिने ठामपणाने आई बाबांना सांगितले की पुरू असे काम करणारच नाही.

माणसाने एकदा विवेक सोडलाना त्याला चांगलं आणि वाईट काहीच कळत नाही. दस्युलोक लपून-छपून पौरव राष्ट्रात आले. पुरू पौरव राष्ट्राचा राजकुमार आहे हे समजल्यापासून लाचीचे आई बाबा तिला पुरू बरोबर बोलू देत नाहीत. पुरु आपल्या भारत मातेसाठी एक होऊन लढूया म्हणून नारा देत असे. दस्युंना पौरव राष्ट्रात डरायसने जिथे धनसंपत्ती ठेवलेली होती तिथे धाड घातली. होलिका उत्सव चालू असेपर्यंत त्यांना ते काम पूर्ण करायचे होते.

शॉ डरायस, बमनी राजांचे व्याही होणार होता. होळीच्या दिवशी कनिष्क आणि बारशीन यांचा विवाह सोहळा होणार होता. अनसुया आणि पुरुला ते मान्य नव्हते. पूरु, डरायस ने कुठे कुठे धन ठेवले याचा शोध घेत जात होता, त्याला तिथे लाची भेटली. दोघांनी खूप दिवसांनी भेटल्यावर, संपूर्ण आयुष्यभर एकमेकांना साथ द्यायची ठरविले. इकडे पारसीचे बाजार उद्धवस्त झाले धन लुटले गेले, हे समजल्यावर पारसी होळीच्या दिवशी बमनी महाराजांच्या कुटुंबाचा खून करायचा इरादा मनात धरून संपूर्ण कुटुंबाचा नाश करायचा विचार करतो परंतु पुरुच्या उपस्थितीत ते शक्य झाले नाही.

पौरव राष्ट्रात, सर्व पौरव हस्ती अंभि कुमार, लाची, अंभीराज, सर्व एकत्र येऊन त्यांच्यामध्ये दस्यू पण सामील झाले. सर्वानी मिळून पारस ला

जायला सांगितले, बार्शीन ने कनिष्कशी विवाह करण्यास नकार दिला. डरायसची सगळीकडून मानहानी झाली. त्यामुळे त्याने परत आपल्या मायदेशी जायचे ठरवले. अशा रीतीने पारसी पारसला गेला. सर्व पौरवजनांनी भारत जयतु, भारत जयतू म्हणत नारा दिला. जाताना पुरूने पारस च्या राजकुमारीला सांगितले की तुझ्यावर कधी काही संकट आले, काही मदत लागली तर मला बोलव. मी तुला नक्कीच मदत करेन राजकुमारीला हे ऐकून खूपच बरे वाटले.

डरायस आपल्या मायदेशी परत गेला परंतु तो राजकुमारीवर राग राग करतो. त्याला फक्त धन-संपत्तीची आस होती. पुरू मुळे त्याचे स्वप्न धुळीला मिळाले ह्याचा राग होता.

ऑलिंपिया सिकंदरला सांगितले की तू भारत देश सोडून दुसऱ्या देशावर आक्रमण कर म्हणून सिकंदरला हे ऐकून आश्चर्य वाटले जन्मल्या पासून सोने की चिडियाला हासिल कर म्हणून सांगणारी आई मला आज का अडवते आहे. म्हणून विचारल्यावर ती सांगते ओरॅकल नावाची स्त्री आहे व तिला वर्तमानात काय घडणार हे सर्व कळत असते. तिने असे सांगितलेले असते की सिकंदर भारतात जाऊन परत जीवित मॅसेडोनियाला येणार नाही त्या दिवसापासून ऑलिंपिया त्याला भारतात पाठवायला घाबरत होती. सिकंदर हे सर्व मानत नव्हता. क्रूर सिकंदरने डेल्फी ह्या ठिकाणी जाऊन ओरॅकलवर हल्ला करून तिला ठार केले.

मेसेडोनियाच्या गुरुनी असे ही वर्तविले होते की ज्या दिवशी सिकंदराचा जन्म झाला त्याच दिवशी भारताच्या एका वीर योद्धयाचा पण जन्म झाला आहे ही सर्व माहिती पोरसचीच म्हणजेच पुरुचीच. सिकंदर विश्वविजेता बनण्याचे स्वप्न घेऊन आला तर त्याच वेळी त्याचा प्रतिस्पर्धी परकीय आक्रमणापासून आपल्या देशाचे रक्षण करणार आणि विदेशींच्या

ताब्यात आपली मातृभूमी देणार नाही. म्हणून प्रतिज्ञा केलेला वीर योद्धा तोच हा पोरस. जिथे सूर्योदय आधी होतो तिथे सिकंदर चा प्रतिस्पर्धी आहे.

पौरव राष्ट्रात, तीन देश युद्ध करत होते. पारसीचे सैन्य आणि तक्षशिला एक होऊन पौरवांबरोबर लढत होते. तक्षशीलेचा आंभिराज देशद्रोही होता. तो पारसच्या बाजूने लढत असता, अनसूयेला आपल्या भावाची लाज वाटली. परंतु महाराज बमनी, अनसुया, पुरू, लाची, हस्ती, अंभीकुमार आणि पौरव ह्या सर्वांना लढायला लावून पारसी ने तिथून पळ काढायचा विचार केला. आपल्या माणसांबरोबर लढायचे नसतेच. परंतु ते राष्ट्र लुटायला, त्याच्यावर आक्रमण करायला आलेले होते. पुरुला सगळीकडेच आपले भारतीय सैन्य एकमेकांशी लढून जीव गमावत होते ते सर्व थांबवायचे होते. त्याने आपल्या बलाने भला मोठा खांब हलवून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आणि सर्वांना उद्देशून सांगितले की आपण सारे आपलेच शत्रू असल्यासारखे लढत आहोत पण खरा शत्रू तर पारशी आहे तुम्ही सर्व लढत रहा, तसेच मी माझ्या शेवटच्या श्वासापर्यंत अखंड भारतासाठी मी लढणार. माझ्या आईचे स्वप्न मी पूर्ण करणारच भारत जयतू, भारत जयतू म्हणत आपण सर्व एकत्र येऊन पारसीला परत त्याच्या मायदेशी पाठवूया. आपल्या भारत मातेसाठी एक होऊन लढूया म्हणून घोषणा देऊ लागला.

महाराज बमनीनी पूरुचा युवराज म्हणून राज्याभिषेक करायचा ठरवले, जेव्हापासून पुरू, लाची तारुण्याच्या उंबरठ्यावर आले, तेव्हापासून त्या दोघांना खूप काही सहन करावे लागले होते. त्यात चांगल्या गोष्टी कमीच होत्या.आता पुरु स्थिर झाला होता. खूप दिवसांनी त्या दोघांच्या जीवनात चांगले घडले होते. म्हणून पूरुने लाचीला सन्मानाने मागणी घातली. राज्याभिषेकाच्या सोहळ्याच्या आदल्या दिवशी तुला भार केला. त्यात एका बाजूला पूरु आणि दुसऱ्या बाजूला सुवर्ण ठेवायचे ठरते. त्यात

लाचीचे पैंजण जेंव्हा ठेवले तेंव्हा तुला भार पूर्ण झाला. महाराणी अनसूयाने महाराजांना सांगितले ही लाची आपली होणारी सून आहे. बमनी महाराज खूपच आनंदी आणि खुश झाले, एवढी पराक्रमी वीर, सुंदर योद्धा आपली सून म्हणून मिळाली.

दुसऱ्या दिवशी राज्याभिषेकाचा सोहळा चालू असताना राजगुरू चिंतित झाले, म्हणुन. अनसुया आणि पुरुनी गुरुजीना विचारल्यावर गुरुजींनी सांगितले की त्यांना होम हवन करताना एक दुष्ट चेहरा दिसला होता. राजगुरुनी सांगितले, की डरायस पेक्षा भयंकर विघ्न आपल्या राष्ट्रावर येणार आहे. तेव्हा पूरुने विचारले, गुरुजी जे काही असेल ते स्पष्ट सांगा.

राजगुरूनी एक अक्षरांचा पट आणायला सांगितला पुरुचे डोळे बांधून हातात मोरपीस घेऊन एकेक अक्षरावर मोरपीस ठेवत जायचे नंतर त्या अक्षरांच्या काय अर्थ होतो ते शोधायचे. त्यांना अलेक्झांडरचे नाव सापडले. त्याच वेळेला एक स्त्री अंगात पांढरा डगला, केस लालसर, डोळ्यात तेज आणि करुणा असलेली देवदूत ओरडत तेथे आली. हे थांबवा हे थांबवा असे ओरडत आली. कोणालाच काही कळत नाही नंतर त्या स्त्री ने उलगडून सांगितले अलेक्झांडर खूप माजला आहे त्याला मारून टाक नाहीतर रक्ताच्या नद्या वाहतील. हे थांबवा हे थांबवा असे सांगून ती रडायला लागली आणि हे पण तिने सांगितले की मी देवदूत आहे, तुम्हाला हाच निरोप देण्यासाठी देवाने मला पाठवले आहे. एवढे बोलून ती स्त्री निघून गेली. हे सर्व पाहून सर्वजण अचंबित झाले. तेव्हा पुरू ने राजगुरू पुढे प्रण घेतले की मी त्या अलेक्झांडरला सोडणार नाही.

सिकंदरच्या आईला माहित होते की फिलीप मेसेडोनियाचा राजा हा काही आपल्या मुलाला पुढे येऊ देणार नाही म्हणून ती देवांचा धावा करते. तिच्या मुलाला आशीर्वाद देण्यासाठी येशूची माणसं आली होती. आणि

सिकंदर ने युद्ध कसे करावे हे पण सांगितले, ते म्हणाले त्याला दोन मार्ग आहेत. जर तुझे नाव अमर राहायला हवे असेल तर युद्ध कर. तुझ्या पुढे कोण येतात ते विचार करू नकोस. अर्थात सिकंदरने युद्धाची इच्छा दाखवली. त्याच्या वडिलांना पारसवर आक्रमण करायचे होते. त्यांनी तयारीही केली होती. सिकंदरला देवदूतानी सांगितले तू युद्धासाठी पूर्व दिशा निवड आणि भारत देशाला जा.

भारतावर मी आक्रमण करणारच असे आपले ठाम मत मांडून सिकंदर सैन्य पारस, सीरिया, मिश्र, मेसेपोटेमिया असे करत भारतावर कूच करणार म्हणून बाहेर पडला. त्यामुळे ऑलिंपियाला खूप दुःख झाले, जड अंतकरणाने तिने त्याला पाठवले. सिकंदरला गर्व झालेला होता की पहिला युनानी पारसवर हमला करणारे आपणच आहोत. डरायस अजून पौरव राष्ट्रातून पारसला पोचलेला नव्हता. ते सर्व जहाजातून प्रवास करतच होते.

पारसचे सैनिक भाला घेऊन लढत होते आणि सिकंदर च्या सैन्यानी दोन्ही हातात तलवार घेऊन सपासप माणसांना कापले. दोघांमध्ये घमासान युद्ध झाले. पारसीनी, सैनिकांची प्रेते झेलम नदीच्या पाण्यात टाकली. इतके जोरात युद्ध झाले की नदीचे पाणी रक्ताने लाल झाले होते.

पारसची राजकुमारी दूरचा विचार करून पोरसला/पुरुला खलिता पाठवले की आम्हाला सैन्याची मदत हवी आहे आणि डोळ्यासमोर जे घडत होते ते सर्व खलित्यामध्ये लिहून पाठवले की डरायसला सिकंदर किती क्रूर आहे हे माहीत नव्हते. तो आपल्या सेनापतीला हेच म्हणत होता की आपण आपल्या सैन्याची ताकद लावूया म्हणजे तो पळून जाईल. बाकीचे मोशीएस, फारूस, बारसिंन, सर्वजण घाबरलेल्या मनस्थितीत होते.

सिकंदर पारस जवळच्या हल्लानिकस ह्या गावी आपल्या प्रचंड सैन्यानिशी पोचल्यावर त्याला आजूबाजूचे सल्तनत पण घ्यायचे होते.

कैरीया, बॅक्ट्रिया असे आजूबाजूचे सल्तनत होते. सिकंदर कैरीयाच्या मल्लिका कडे गेला. तिचे नाव अदा होते. तिथे तिच्या आधी अक्रीज नावाचा राजा होऊन गेलेला होता. आता तिथे अदा राज्य करत होती. सिकंदरला पाहून ती विरांगना हातात तलवार घेऊन सज्ज होऊन लढतच आली. त्या दोघांमध्ये द्वंद्व युद्ध झाले. नंतर दोघात वाद झाला. तिने सिकंदरला बरोबर ओळखते.

कैरीया हुन निघताना सिकंदर मलिका अदाला सांगतो मी तिकडून आल्यावर तुझ्या डोक्यावर मुकुट असेल. सिकंदरने (५००००) शिपायांना घेऊन पारस कडे कूच केले. डरायस आपल्या महालापर्यंत अजून पोचलेला नव्हता त्याला सर्व माहिती मिळाली. अलेक्झांडर ने कैरीयाच्या मलिकाचे गेलेले वैभव परत मिळवून दिले ती म्हणते की अलेक्झांडरला माझा मुलगा समजा. आता सर्व मिळूनच पारस वर आक्रमण करणार होते. त्या देशाची एक अट होती, तिथे (गोडियन्सचे पहेली) कोडे म्हणतात. ह्या नावाचे लाकडाचे तीन पायावरती एक आडवी पट्टी, मध्ये जाड दोरीनी बांधलेले असते. त्याची दोन्ही टोके कोणाला दिसत नाहीत, टोक शोधून त्या दोरीची गाठ सोडवायची असते.

अलेक्झांडर आणि त्याचे सेनापतीनी मिळून प्रयत्न केला. अलेक्झांडरने बराच प्रयत्न करून त्यात यश मिळवले म्हणून तिथे जमलेल्या सर्व जणानी सिकंदर सिकंदर करून घोषणा दिली. कैरीयाची मल्लिका अदाने त्याला सिकंदर म्हणून संबोधले, तेंव्हापासून अलेक्झांडरला सिकंदर म्हणू लागले. मॅसेडोनियाची कुठल्याही प्रदेशावर आक्रमण करायच्या आधी तिथल्या लोकांना सावध करण्यासाठी लांबून भाला फेकून संदेश पाठवायची पद्धत होती त्याप्रमाणे सिकंदर आणि त्याचे सेनापती हिफ्यास्तियस, आणि क्लितस यानी भाला फेकून संदेश दिला. डरायस ने, सिकंदरला युद्धासाठी

ललकार ले. एक लाखापेक्षा जास्तीत जास्त सैन्य अकरा हजार घोडेस्वार ६०००० पैदल १०००० शस्त्र घेतलेले सैन्य तैनात करून सिकंदरला युद्धासाठी आव्हान दिले.

राजकन्या बारसिंन ही पण वीर योद्धा होती परंतु तिला वडिलांचा धाक होता.डरायसने मुलीला पारस सोडून जाण्यास सांगितले, त्याला वाटत होते तिच्यामुळे आपण युद्ध हारणार, पुरूने त्याला चांगलाच धडा शिकवला होता. तरी पण ह्या माणसाची पौरव राष्ट्रावर आणि भारतावर वाईट नजर होतीच. अलेक्झांडर आणि त्याचे सैन्य यांनी पारस सैनिकांचा खात्मा करून त्याला निरोप पाठवला. सिकंदर धूर्तपणाने लढत होता, आता त्याच्याकडे सैन्य कमी होते, परंतु जिथे जातो तिथे जो माणूस समोर येतो, त्याना सपासप कापत सुटायचे असे सेनापतींना सांगितले, अशीच दहशत करावी म्हणजे लोक घाबरतात. तो जिथे जाईल तिथे राक्षसासारखा वागून संपूर्ण गाव उद्ध्वस्त करून टाकत असे.

परंतु डरायस ने ठरवले की सिकंदरला आपला पारसी बाणा दाखवायचा. खूप वेगवेगळी हत्यारे अवजारे वापरून सिकंदरने पारसवर आक्रमण केले. दुसऱ्या दिवशी सिकंदरशी लढताना डरायस युद्धभूमी वरून पळून बॅक्ट्रियाला गेला, त्याने तिथल्या राजाकडे अजून सैन्याची मागणी केली. बॅक्टरियाची राजकन्या डरायसला म्हणाली तुम्ही तुमच्या कुटुंबाला, आणि सैनिकाना, सोडून इकडे का आलात ?

बॅक्टरियाची राजकन्या रुकसाना खूप चालबाज होती, तिने डरायस समोरच त्याच्या सेनापती मोशीअसला चाकूने वार करून संपवले. तिचे वार कधी चुकत नव्हते. पुरुला बारसीन ने पाठवलेला खलिता मिळाल्यावर तो पारसला निघण्याची तयारी करणार होता. पुरू,  हस्ती, लाची, आंभिकुमार, ह्या सर्वांना त्यांच्या मातानी मंगल तिलक लावून ओवाळून त्यांना

विजयश्रीचा आशीर्वाद दिला. पुरुला अनसूया, हस्तीला पृथा, लाचीला महानंदा, आंभिकुमारला अलका, सर्व महाराण्या एकत्र जमून शुभेच्छा दिल्यावर सर्वांनी पारसला जहाजाने जायला निघाले.

जहाजाने प्रवास करताना खूप विघ्ने आली. कनिष्क आणि शिवदत्त हे दोघे मिळून काही करून पुरूने परत पौरव राष्ट्रात सुखरूप पोहोचू नये असा विचार करत होते. कनिष्क आणि शिवदत्त हे दोघे विषकन्यांकडे जाऊन त्यांना पुरुच्या जहाजात जा म्हणून सांगतात, तेंव्हा विषकन्या विशुद्धीने मध्येच पुरु आणि सर्वांना भेटून मलापण पारसला यायचे आहे असे खोटे सांगितले आणि तिने आपल्या कामुक नजरेने हस्ती आणि अंभिकुमारला घायाळ केले, तसेच त्यावेळी तिच्याबरोबर एक लहान मुलगा पण होता. ह्यांना वाटले सांसारिक स्त्री आहे. बरोबर लहान मुलगा पण आहे, म्हणून त्यांनी तिला आपल्या बरोबर प्रवासात घेतले. पुरुला तिच्या हावभावावरून लक्षात आले की तिच्या मनात काहीतरी वाईट विचार आहेत.

हे चारही जण तिच्याशी आणि त्या लहान मुलांशी खूप चांगले वागत होते. एके दिवशी हे चौघेही जहाजाच्या वरच्या मजल्यावर असताना विशुद्धीने जहाजाला खालून भोक पाडले. आणि आपण एका उंच जागी जाऊन बसली. सर्व जणांनी खाली येऊन पाहिले तर जहाजात पाणी आले होते. लहान मुलाला विचारले की हे कसे घडले? तर त्या मुलाने सर्व काही खरे सांगितले. पारसच्या जवळ येता येता जहाज बुडायला लागले विशुद्धीला पोहता येत नव्हते. चौघानी मिळून त्या दोघांना विशुद्धी ला आणि तिच्या मुलाला वाचवले. नंतर तिने आपले वाईट गुण सोडून त्यांना त्यांच्या कामात मदत करायला लागली.

तिकडे पौरव राष्ट्रात अशी बातमी उठली की पुरु, लाची, हस्ती

आणि अंभीकुमार यांचे पारसला जाताना जहाज बुडाले, ते सर्व आता परत येणार नाहीत अशी खोटी बातमी आल्यावर महाराज बमनी, महाराणी अनुसूया दोघेही आधी विश्वास ठेवत नाहीत. नंतर हळूहळू ही बातमी त्यांना ही खरी वाटली. अमात्न शिवदत्त राजकुमार आता परत येणार नाही. म्हणून महाराणीला बंदीगृहात ठेवून कनिष्कला राज्याभिषेक करायचा ठरविले, सिंहासनाच्या लोभापोटी हे सर्व चाललेले होते.

पुरू पौरव राष्ट्रात नसताना शिवदत्तच्या डोक्यात खूप वाईट विचार आले. बमनीच्या जागी एक तर कनिष्क किंवा आपण स्वतः सिंहासनावर बसायचे होते. म्हणून त्याने जहाज बुडून सर्व जण बेपत्ता आहेत, अशी खोटी वार्ता पसरवली. संपूर्ण पौरव राष्ट्रात कनिष्कला राज्याभिषेक करायचे ठरवले. पौरव राष्ट्रातल्या नागरिकांना शिवदत्तच्या वागण्याची भीती वाटत होती, अमात्य म्हणून तो काहीही करू शकत होता. कानिष्कची आई, महाराजांची दुसरी बायको कनिका खूप चांगली होती. ती पण शिवदत्तच्या वागण्याने घाबरली. कनिष्कला राज्याभिषेक केल्यावर शिवदत्त ने बमनी महाराजांना आणि अनुसयेला वेगवेगळ्या ठिकाणी बंदी गृहात ठेवले. नंतर त्याने अनुसयाला गणिका गृहात पाठवले, त्यावेळी सर्व गणिकाना महाराणीना पाहून आश्चर्य वाटले, परंतु अनुसयाने तिथल्या सर्वांना एकत्र बोलावून आपल्या मनातला विचार सांगितला आणि त्या सर्वाना तलवारबाजी शिकवली. हे पण सांगितले की कोणी घाबरू नका मी आहे तुमच्या बरोबर. शिवदत्त तिला भेटायला रोजच येत असे. त्या सर्वजणी नी ठरवून शिवदत्त वर प्रहार करून त्याला संपवले. अनुसूया विरांगना होती तिच्या समोर पौरव जन येण्यासाठी घाबरत होते. कारण ती किती शूरवीर आहे हे सर्वच जाणत होते.

पाचीजण म्हणजे पुरु, हस्ती, लाची, अंभिकुमार, विशुद्धी म्हणजे

नागकन्या पारसला येऊन पोचल्यावर तिथे काय चालले आहे? त्याचा शोध घेतला. अलेक्झांडरची माणसं पारसच्या नागरिकांना मारत होती. तेव्हा अलेक्झांडर म्हणाला, त्यांना मारू नका. हे लोक आता आपले आहेत. आपल्या सैन्यात ते पण सामील होतील. असे लोभी अलेक्झांडर बोलत असता, हे पाची जण स्वतःला लपून छपून सर्व काही न्याहाळत होते. त्यांना डरायस च्या महालात पोहोचायचे होते. परंतु सगळीकडेच पारस चे नागरिक अलेक्झांडरच्या भीतीने सैरावैरा पळत सुटलेले होते. डरायस अजून आलेला नव्हता .त्याची भार्या आणि दोन्ही मुली चिंतीत होत्या. डरायस च्या पत्नीने आपल्या दोन्ही मुलींना सांगितले आपण तिघी मिळून विष पिऊया. तिला आपल्या दोन्ही तरुण मुलींची काळजी वाटत होती. अलेक्झांडरची माणसं क्रूर आहेत, हे तिने ऐकलेले होते आणि तिने पण विचार केला आणि एका सैनिकाला बोलावून त्याच्या हातात तलवार देऊन आम्हाला तिघीना मारून टाक असे सांगितले, परंतु मोठी मुलगी बारसीनने हिम्मत सोडली नाही. तिला हे माहीत होते की पुरू येणारच आपल्या मदतीला. आणि खरंच पुरू आणि त्याचे तिन्ही चारी साथीदार तिथे पोहोचलेच. त्या सर्वांना राजमहालात जाता येत नव्हते कारण आता ते अलेक्झांडरच्या ताब्यात होते.

लाची आणि पुरु दोघानी मिळून पौरवराष्ट्रात काचेमुळे आग लावली होती ती शक्कल लढवून पुरु महालाच्या जवळ आग लावतो त्यामुळे बारसीन ने ओळखले पुरू आलेला आहे.

महालाच्या समोरच सभा भरवली गेली होती. त्यात अलेक्झांडर मुख्य होता. त्याच्या सर्व सैनिकांनी येऊन त्याच्या पायाच्या पादत्राणाचा मुका घेऊन मान खाली घालून उभे राहायचे अशी पद्धत होती. पारसच्या नागरिकांना हे सर्व घृणास्पद वाटले, अलेक्झांडरच्या सर्व सैनिकानी असे

केल्यानंतर पारस च्या नागरिकानी एकमेकांकडे बघून इशारा केला. तेंव्हा एक लहान मुलगा म्हणाला राजा असा असतो का? हे ऐकून सिकंदरला राग आला. सिकंदर ने त्या मुलाला जीवे मारण्याची धमकी दिली. म्हणून त्याच्या आई-वडीलानी सिकंदर पुढे गयावया केले. परंतु ह्या पाच जणांनी मिळून त्या मुलाला वाचवले. सिकंदरला संशय आला की कोणीतरी आपल्या विरुध्द कट रचत आहे आणि बारसीन पुरुची मैत्रिण पण त्या सभेमध्ये होती .

त्या रात्री सिकंदरने जंगी पार्टी ठरवली होती. डरायसची बायको आणि दोन्ही मुलीना त्यामध्ये काहीच रस नव्हता. कारण युद्धभूमी वरून पळालेला डरायस अजून आलेला नव्हता. विशुद्धी नागकन्या दिसायला खूप सुंदर तर होतीच आणि तिच्या विषारी चुंबनाने तिथल्या लोकांना घायाळ करत होती, सर्वांना पेय देत नृत्य करत त्या समारंभात सामील झाली. तोपर्यंत हे चौघे राजमहालाच्या वरच्या मजल्यावर जाऊन बारसीनला भेटले. आणि हे सर्व मिळून त्या तिघीना सुरक्षित पौरव राष्ट्रात घेऊन जाणार होते..

त्या तिघीना महालाच्या बाहेर काढलं तेव्हा सिकंदर त्यांना उद्देशून म्हणाला मी तुम्हाला तिघीना मारणार नाही असे म्हणून बारसीनकडे संशयी नजरेने बघत राहिला त्याचा डोळा बारसीन वर होता. त्याला पूरु बद्दल काहीच माहीत नव्हते, त्या लहान मुलाला वाचवले म्हणून सिकंदरचा पुरू वर राग होता म्हणूनच त्याला बंदीगृहात ठेवून दुसऱ्या दिवशी त्याची परीक्षा घेणार होता. ज्या देशावर आपण आक्रमण करणार आहोत तिथले योद्धे कोणत्या पद्धतीने लढतात हे पण पाहायचं होते.

या चौघानी म्हणजे पुरु, हस्ती, लाची आणि अंभिकुमार यांनी पुरुने सोपवलेले काम केले. सिकंदर लढताना कोणती कोणती अवजारे वापरतो त्याचा शस्त्रसाठा कुठे आहे ते सगळं पाहण्यासाठी फिरत होते.

दुसऱ्या दिवशी पुरूची परीक्षा होती. बलाढ्य योध्यानबरोबर पुरुला

लढावे लागले पण पुरु कुणाला घाबरत नव्हता आणि कुठले काम अर्ध्यावर कधीच सोडत नव्हता.

अलेक्झांडर त्याचे दोन सेनापती, बार्शीन, तिची आई, बहीण आणि ऑलिंपिया हे सर्वजण पुरू कसा लढतो हे बघण्यासाठी जमलेले होते. ऑलिंपिया मनातून घाबरलेली होती. पौरव राष्ट्राच्या राजकुमार पुरुने शूर पणाने लढून आणि मॅसेडोनियाच्या सर्व योद्‌ध्यांना घायाळ केले.

सिकंदर पुरुचा साहसपणा पाहून थक्क झाला. जिथे अलेक्झांडर बसलेला होता, तिथे जाऊन त्याच्या मानेवर तलवार धरून पुरुने सांगितले मीच पुरू पुरुषोत्तम आहे. तोपर्यंत या चौघानी हस्ती लाची अंभीं कुमार, आणि विशुद्धी सिकंदरचा तिथल्या शस्त्रसाठा आणि अवजारांना आणि दारूगोळ्याला आग लावून जहाजात बसले. तिथून निघताना पुरू ने सिकंदरला सांगितले तूच भारतावर आक्रमण करणार आहेस ना मग ये पण तुला सोने की चिडिया सोड तिचा पंख पण तुला मिळणार नाही. सिकंदर चे दोन्ही सेनापती, ऑलिंपिया हे सर्व घाबरलेले होते. बारसीन तिथून निघणार तेवढ्यात पारसच्या नागरि कानी त्यांच्यापुढे गयावया केली आणि आम्हाला सोडून तुम्ही जाऊ नका असे म्हणाले त्यामुळे त्या तिघी पारस मध्येच राहिल्या.

**पारसहुन आल्यावर घडलेली कहाणी---**

पौरवराष्ट्रात पुरु नसताना शिवदत्त आणि कनिष्क मिळून महाराणी अनसुया आणि महाराज बमनीना बंदीगृहात ठेवतात. कनिष्कचा युवराज पदाचा सोहळा योजून नंतर मृत्यू दंड देणार होते. त्याच वेळेला पुरु आणि त्याचे साथिदार पौरवराष्ट्रात परत आले. पारसहून हे पाच जण आल्यावर कनिष्क आणि पुरू मध्ये वादावादी झाली आणि त्यात बमनी महाराज जखमी झाले. पुरू त्यांना तक्षशिलेच्या वैद्य चाणक्यांकडे घेऊन गेला.

बमनीराजे बरे झाल्यावर पुरू, अंभि कुमार, हस्ती हे सर्वजण, पौरव राष्ट्राकडे जाण्यासाठी सज्ज झाले. तेव्हाच आंभिराज सिकंदरचा संदेश घेऊन आला. त्यानंतरच चाणक्य पुरुला युद्धाची तयारी करायला सांगून पोरसचा संदेश घेऊन स्वतः सिकंदरकडे जातो असे सांगून सिकंदरकडे जायला निघाले.

अलेक्झांडरकडे जाताना चाणक्य आपल्या भारतीय परंपरेनुसारच गेले. मंदिरात  जसा अर्चकांचा पेहराव असतो तसा पेहेराव, हिरमुंजी रंगाचे धोतर खांद्यावर उपरणे, शिखा, गळ्यात जपमाळ, हातात त्यांच्या उंचीच्या बरोबर असलेला दंड, त्या दंडात तेवढ्या लांबीची तलवार, कपाळावर मंगल तिलक, खांद्याला झोळी, आणि हातात कमंडलु. तसेच त्यांच्यात अचानक समोर सैन्य दुश्मन आले तर एका हाताने लढून चित करण्याची ताकद शक्तिमान होते.

चाणक्यांनी चारी वेदांचा अभ्यास केला होता आणि संस्कृत, मोडी, मगध, भाषा त्यांना अवगत होत्या. त्याबरोबर त्यांनी युद्धकला आत्मसात केलेली होती असे चाणक्य रथावर स्वार होऊन सिकंदर ला भेटायला गेले.

तक्षशीलेच्या छावणीत चाणक्य आल्यावर सर्वजण त्यांच्याकडे आश्चर्याने बघत होते. सिकंदरचा सेनापती हीप्यास्टियस त्याला वर्दी दिल्यावर त्यांनी चाणक्याशी संवाद साधला. आचार्यांनी स्वतः सिकंदर ला सांगितले मी पौरव राष्ट्राचा संदेश वाहक म्हणून आलो आहे. आणि पुढे हे ही सांगितले की एक सम्राट आणि  विद्वान यामध्ये खूप अंतर असते सम्राटाला त्याच्या राज्यातच सन्मान मिळतो. परंतु विद्वानाला सर्वच पुजतात. धनाने ज्ञान अर्जित करता येत नाही ,पण ज्ञानाने धन अर्जित करता येते. शेवटी ते असे ही म्हणाले मला तू आत बोलवणार आहेस की नाही  उभे राहून किती वेळ बोलणार? असे म्हणून स्वतः छावणीच्या आत जाऊन बसले, आपल्या भारतीय परंपरेनुसार त्यांनी स्वतः संध्याकाळी संध्या केली संध्याकाळच्या

भोजनाची तयारी स्वतःच करून आणलेली होती. भोजनाची तयारी, केळीचे पान कमंडलू सर्व तयारीनिशी आलेले पाहून सिकंदर त्यांच्याकडे बघत असे म्हणाला मला ह्या सर्व गोष्टीत काही रस नाही. तरीपण आचार्य चाणक्य प्रथेनुसार जेवणाच्या आधी म्हणायचे श्लोक चित्रावती ठेवून अन्न हे परब्रम्ह असते असे सांगून नमस्कार करून जेवायला बसले.

आचार्यांनी निघताना कूटनीतीने सिकंदरला पुरुच्या राज्याभिषेका साठी आमंत्रण केले, आणि ते स्वतः सिकंदरला आणि त्याच्या सेनापतींना पौरव राष्ट्रात घेऊन आले. आचार्य चाणक्य, सिकंदरला निमंत्रण देऊन कूटनीतीने पौरव राष्ट्रात घेऊन आले ते राज्याभिषेकाच्या वेळी पूरू पौरव राष्ट्राचा राजा म्हणून सिंहासनावर बसणार होता. त्या समारंभाला सिकंदर आणि त्याचे सेनापती पारसहून पौरव राष्ट्रात येईपर्यंत तिथल्या सृष्टिसौंदर्याने नटलेला भारत देश बघतच आले.

मनोमनी म्हणत आले (सोने की चिडिया) नावा पेक्षाही भारत खूपच सुंदर आहे आणि राज्यात येताच राजवाड्याची शोभा पाहून त्यांचे डोळे दिपले. पौरव राष्ट्रात पुरू राजसिंहासनावर बसणार म्हणून सगळीकडेच आनंदी आनंद ओसंडून वाहत होता. अनसुया आणि बमनी महाराजांच्या आनंदाला पारावारच नव्हता आणि त्यात लाची मधून मधून पुरुला म्हणत होती आता काय बाबा एक माणूस राजा होणार. पुरू म्हणाला राजा होणं एवढं सोपं नाहीय.

राजमहाल आणि प्रांगण सुशोभीकरणाने खूपच उठून दिसत होते .पुरुला आचार्य चाणक्य यांच्या कूटनीती बद्दल काहीच माहिती नव्हतं. सर्वजण खूप आनंदित असताना आणि पुरुचा अभिषेक चालला असताना आचार्य चाणक्य, सिकंदर आणि त्याचा सेनापती हीप्यास्टियस आणि पाच सहा सैनिकाना घेऊन राजवाड्यात आले.

पुरू सर्व काही आनंदाने  राजगुरू ना विचारून करत होता. चाणक्य सिकंदरला अभिषेका बद्दल माहिती सांगत होते, जल कुठून आणलं? त्यात हळद का घालतात? अभिषेकाच्या जलामध्ये फुलांच्या पाकळ्या का घालतात? दूध आणि मधुने अभिषेक का घालतात? मंगल तिलक का लावतात? थोडावेळ सिकंदर ने सारे काही ऐकून घेतले नंतर चाणक्यानी जोरात पुकारा केला. महाराज पुरुषोत्तमाचे राज्याभिषेकाच्या कार्यक्रमात सिकंदरचे स्वागत आहे. चाणक्यानी असे म्हटल्यावर, सम्राट सिकंदरला वाटले की आपल्याला आता बंदी बनवणार, एल्गार हो, म्हणतच सिकंदर ने पूरूकडे जोरात भाला फेकला, पुरूने आवाजानेच भाला पकडला. चाणक्यांचे वाक्य ऐकून सर्वजण शांत झाले, पुरु म्हणाला की कोणी तलवार बाहेर काढली तर तुम्हा सर्वांना आताच मारून टाकीन असे म्हणताच, सिकंदरने हातातले शस्त्र खाली टाकले. पुरू स्वतः तलवार उगारून सिकंदरच्या पुढे येऊन थांबताच सिकंदरने लखोटा दाखवला. त्यामुळे त्याचे सर्व सैनिक, सेनापती, अचंबित झाले.

नंतर सर्व शांतपणाने अभिषेकाचा कार्यक्रम झाल्यावर पुरू वस्त्र, आभरण, मुकुट सर्व परिधान करून सिकंदरला भेटायला आला. तेंव्हा चाणक्य म्हणाले ह्याला आताच बंदी कर, कूटनीती हेच शिकवते साप समोर दिसला की मारून टाकावे. परंतु पुरुला हे पटत नाही सिकंदर राज्याभिषेकाच्या कार्यक्रमासाठी अतिथी म्हणून आलेला आहे, असे करणे उचित नाही. पुरुचे हे बोलणे ऐकून चाणक्याना राग आला असला तरी ते पौरवराष्ट्र आणि पुरुचे हितचिंतकच होते. जाताना आचार्य चाणक्यांनी महाराज बमनी आणि महाराणी अनसुराला पुरुच्या विवाहाची पुर्व तयारी करण्यास सांगून मंगल घटिकेचा मुहुर्त दोन दिवसानंतर आहे असे सांगितले. पुरुच्या राज्याभिषेक झाल्यानंतर पौरव राष्ट्राचा दुसरा राजकुमार कनिष्क आणि लाचीचा भाऊ दस्यू राजकुमार सुमेर दोघांनी सिकंदर बोरबर हात

मिळवणी केली आणि दुष्ट सिकंदरच्या सांगण्याने पुरुची हत्या करायला विवाह मंडपात आले.

पुरू विवाह मंडपात असतानाच सुमेर हातात तलवार घेऊन पुरूवर वार करणार होता, अनुसयेला सुमेरच्या वागण्यावरून कळले होते की हा पुरुला मारायलाच आला आहे. ते पाहून अनुसूया सुमेरशी दोन हात करत असताना सुमेर जागीच गतप्राण झाला. सिकंदरच्या सांगण्यावरूनच कनिष्क सुमेर दोघेही सिकंदर च्या बाजूने होते. एका देशद्रोह्याला चांगलीच शिक्षा मिळाली. परंतु लाची आता पौरव राष्ट्राची महाराणी झाली होती. तिच्या सासूच्या हातून सुमेर लाचीचा भाऊ मारला गेला म्हणून तिचे आई-बाबा आता पौरव महाराणी अनुसया अपराधी असल्यासारखे वागु लागले होते. अनुसया ने त्यांना सांगितले मी लाचीच्या भावाला मारले नाही तर एक देशद्रोही म्हणून त्याला मारले.

इकडे ओलंपिया चाणक्यांच्या कुटनिती मुळे क्रोधीत होवून त्यांना शिक्षा करण्याचे ठरविले. त्यांना लोखंडी प्राण्याच्या पोटात ठेवून त्याच्या आग लावणे अशी योजना होती. वाचक हो यवनाना वाटेल भारतीय म्हणजे भारतीय म्हणजे "किस झाड की पत्ती". पंरतू आचार्य चाणक्य आपल्या तर्कबुद्धीने त्या संकटातून बाहेर आले.

सिकंदर डरायसचा शोध घेण्यासाठी बॅक्ट्रियाला गेला असताना तिथल्या राजकन्येशी रॉक्सी, रुकसाना हिच्याशी त्याची ओळख झाली होती. पण प्रत्यक्ष भेटल्यावर सिकंदरला ती आवडली. सिकंदरने तिच्या वडिलांना मारले होते, तो राग तिच्या मनात होता. तिने अलेक्झांडरला डरायसचे प्रेत नजराणा म्हणून पाठवले. ती विवाहास तयार नसताना सिकंदरने बळजबरीने तिच्याशी विवाह केला आणि तो तिला तक्षशिलेला घेऊन आला होता. विवाहानंतर ती त्याच्याशी काहीच संवाद साधत नाही,

परंतू जेव्हा सिकंदर ने पारसच्या राजकुमारीशी मैत्री केली तेव्हापासूनच ते वैवाहिक जीवन जगू लागले.

ओलंपिया छावणीत काली जादू करत होती. आचार्य चाणक्यानी तिला सांगितले की तुझे वाईट दिवस सुरू झाले आहेत. असे म्हणून तिला पौरवराष्ट्राच्या महालात घेऊन आले. ओलंपियाला पुरू भेटल्यावर ती म्हणाली मला तूच हवा होतास सिकंदर असा आहे तसा आहे असे गुणगान गात असताना पुरुने तिचे बोलणेच बंद केले.

पुरु ओलंपियाला म्हणतो आम्ही कोणालाही घाबरत नाही. युद्ध जिंकण्यासाठी मी तुमचा वापर मुळीच करणार नाही. इथे सन्मानाने रहा. जेव्हा जायचे तेव्हा मी तुम्हाला सन्मानाने घेऊन जाईन हे असे भारतीय वीरच बोलू शकतो.

ओलंपियाने आपल्या मुलाला संदेश पाठवला की आचार्य चाणक्य मला पौरव राजवाड्यात घेऊन आलेत. आणि तो संदेश वाचून सिकंदरचा क्रोध अनावर झाला. तक्षशिला येथे अंभीराज, महाराणी अलका, रॉक्सी आणि सिकंदर सर्वजण मिळून ओलंपियाच्या संदेशाबद्दल विचार करत होते. सिकंदरला लगेच पौरव राष्ट्रात जाऊन आईला घेऊन यायचे होते त्याने अंभी राजाला सांगितले तुम्ही पश्चिम दिशेने जाऊन पौरव राष्ट्रावर आक्रमण करा.

अनसुयाचा भाऊ आणि फितुर झालेल्या अंभीराजला तिकडचे सर्व मार्ग माहित होते. त्याला झेलमच्या दुसऱ्या तटावर जायचे होते. अंभिराजाने नाही म्हणताच सिकंदरने त्याला मारण्यासाठी तलवार उचलली. सिकंदर स्वतः जिझसचा मुलगा आहे असे म्हणून देवापेक्षाही तो स्वतःला महान समजत होता .

दस्स्यू राजकुमार सुमेरचा मृत्यू झाला हे समजल्यावर सिकंदर आणि त्याचे दोन सेनापतीनी दस्यू राज्यात जाऊन आगीत तेल ओतले. पुरू असा

पुरू तसा म्हणून सिकंदर सांगत असता महानंदा (दस्युं राणी) त्याला थांबवून सांगितले की आम्ही आमचं बघून घेऊन तुम्ही आमच्या मध्ये पडू नका.

अलेक्झांदरने दस्युंना पूल बांधण्याचे काम करण्यास सांगितले. दस्यू लोकांचा पाण्यावर पूल बांधण्यात हातखंडा होता. म्हणून दस्यु लोक पूल बांधण्यास तयार झाले. पूरु आणि लाचीला वाईट वाटले. पुरुला आता युद्धाची तयारी जोरात करायची होती. त्याने सिकंदरला आणि तक्षशीलेच्या महाराझ अंभिराजना खूप चांगलंच ओळखलेलं होते. कनिष्क सिकंदरच्या छावणीतून पौरव राष्ट्राकडे येताना घायाळ झाला.

अॅलेक्झांदर ने कनिष्कशी हातमिळवणी केल्यावर अॅलेक्झांदर ने कनिष्कला मारले. पुरु आणि महाराज बमनी चोवीस तास झेलमच्या तटावर छावणी घालून कनिष्कची वाट पहात असताना त्यांना कनिष्क सापडला. त्या दोघांनी मिळून कनिष्कला राजवाड्यात आणले.पण खूप उशीर झाला होता. शेवटच्या क्षणी कनिष्कने पुरुची आणि महाराजांची माफी मागुन शेवटचा श्वास सोडला, महाराजांना खूप दुःख झाले.

पुरुला माहित होते, की एकदा सिकंदर नावाच्या राक्षसाने नदी ओलांडली की त्याला महालात शिरायला वेळ लागणार नाही. शत्रू लोकांचे तो पौरव राष्ट्रात सोडाच झेलमच्या तटावरच खंडन करायचे असे पुरु ने ठरवले. पुरू गजसेना, अग्निबाण , तीरकामटे, अश्वदल, सर्व प्रकारची सेना तयार ठेवली. नेहमीच तो स्वतः पुढे असायचा, ह्या सर्वांसाठी पुरुने हजारो लोक कामाला लावले होते.

प्रत्येक नागरिकाच्या मनात भारत जयतु,भारत जयतु हेच वाक्य घुमत होते. पुरू तक्षशिला ते पौरव राष्ट्रापर्यंत येण्यासाठी पूल बांधत असता तो पूल अर्धवट राहिलेला होता. हे पुरुला माहित होते की अलेक्झांडर

नक्कीच पुलाचा वापर करून पौरव राष्ट्रात येणार. तिकडे पुरुला पूर्ण पूल उध्वस्त करायचा होता, त्यासाठी सुरुंग ठेवून लाचीला अग्निबाण सोडण्यास सांगितले लाची मनाने घाबरलेली होती, कारण त्या ठिकाणीच पुरू उभा होता. त्याला काही इजा व्हायला नको. त्या पुलावर सिकंदर चे सैनिक पुरुला मारण्यासाठी आलेले होते. त्याच वेळेला लाचीने पूरूच्या सांगण्यावरून अग्निबाण सोडले. त्यामुळे सर्व सैनिक झेलम नदीत पडले, सर्वांबरोबर पुरू पण नदीत पडला. सिकंदरला आणि त्याच्या सैन्याला वाटले पुरूचा अंत झाला असेल. पूरु दस्यू लोकात राहिल्यामुळे पाण्यात श्वास रोखून पोहत राहण्याची सवय होती. तेथून परतल्यावर पुरुने युद्धाची तयारी अजून जोरात सुरू केली.

# झेलमचे महायुद्ध

रसिकहो, आपण सारे ज्याची वाट पाहत होतो ते (झेलम महायुद्ध) आता जवळ येऊन ठेपले होते, ययातीचा वंशज असलेला पुरू त्याची उंची सात फूट होती. बलवान देहयष्टी असलेला निडर कोणाचीही भीती नसलेला असा पूरू होता.

सिकंदर गंधार देशाला आल्यावर त्याने भारतीय जनपदाना संदेश पाठविला होता. त्याला फक्त तक्षशिलेच्या अंभिराजानीच संमती दिली होती. पूरुने सिकंदरचा संदेश वाचून युद्धासाठी ललकारणा केली होती.

रसिकहो, आपल्या देशावर वारंवार परकीय आक्रमण झाले तेव्हा आपल्या जवळची माणसेच फितूर झाली होती. तसेच तक्षशीलेचा अंभिराज, अलेक्झांडरला पुरूची सर्व माहिती देत होता. तो स्वतः तर देशद्रोही होताच, मुलाला पण अखंड भारतासाठी पोरसला मदत करू देत नव्हता. पोरस गजसेना, धनुष्यबाण, तीर कामटे, भाला, अश्वदल हे सर्व घेऊन

सिकंदरशी लढायला गेला. हे सर्व युनानी लोकांना नवीन होते. हत्तीवर बसलेले सैनिक आणि त्यांच्या हातातील भाला हे सर्व पाहून शत्रुसैन्य घाबरत होते. ह्या युद्धात दस्यू लोक पुरू बरोबर होते.

पुरूने हस्तीला सोळा जनपदा पैकी एका जनपदाचा राजा बनवले, आता तो पूरूच्या उजव्या हाता सारखा काम करत होता. त्याचे वडील रिपुदमन, यांनी शेवटच्या श्वासापर्यंत पौरव राष्ट्रासाठी वाहून घेतले होते. तसेच हस्ती ने आपलं जीवन पौरव राष्ट्राला वाहिले होते.

सिकंदर ने पुरुच्या हत्तीला मारल्यावर पुरू ने घोड्यावर बसून सिकंदरला आपल्या पाठी पळवत नेले. जिथे दस्यू लोकानी नवीन पूल बांधला होता, त्यावरच युद्ध चालू होते. दस्यू राजा राणी लढत असता सिकंदरचा सेनापती हिप्प्यास्तिएसच्या वाराने दस्यु महाराणी महानंदाला वीरगती प्राप्त झाली. पोरस आणि त्याच्या सर्व सैन्याने मिळून सिकंदरच्या सैनिकांना जलसमाधी दिली. राजवाडयात ऑलिंपियाचे मांत्रिक, जादूटोणा, काळी जादू करणे चालूच होते. ती आपल्या राहत्या जागी अनसूयेला लक्ष्य करून काम करत होती. पण आचार्य चाणक्यांच्या मदतीने अनसूयावरचे संकट टळले. एकदा अशी वेळ आली की तिच्या जादूने ऑलंपिया स्वतःच बेशुद्ध पडली. हे पुरुला समजल्यावर आचार्य चाणक्यांशी बोलून त्यांना सांगितले की, काही करून ऑलम्पियाला वाचवा. त्याप्रमाणे राजवाड्यात पंधरा-वीस दिवस अखंड अग्निहोत्र आणि उपचार चालू ठेवले. आणि आचार्यांना ह्या कामात यश मिळाले. पूरुने विचार केला, ओलम्पियाला तिच्या मुलाकडे सोपवावे.

बमनी महाराजानी, हिंदुकुश पर्वताकडे जाऊन घाटावर पूल बांधला. खोल दरीत पडून सिकंदर च्या सैनिकांची संख्या कमी होईल या हेतूने आजूबाजूला मोठी दरी ठेवली. ते ह्या कामात यशस्वी झाले. सिकंदर

बरोबर लढाई चालू असता, पोरस सैन्य घेऊन आला, तेंव्हा आचार्य चाणक्यानी आणि त्यांचे विद्यार्थी, सेनानी ,शत्रूवर अग्निबाण मारून बऱ्याच सैनिकाना यमसदनाला पाठवले.

तक्षशीले च्या अंभिराजनी सिकंदरला शब्द दिला की मी पोरसला तुमच्याकडे सोपवतो. पण ते शक्य नव्हते. वाघाच्या बिळात जायला कोणीच धजत नव्हते. पोरस आणि बमनी महाराज दोघेही पौरव राष्ट्रात नसताना धूर्त अंभिराज ने पौरव राष्ट्रावर आक्रमण करायचे ठरवले.

पुरू ने महाराजांना सांगितले की तुम्ही पौरव राष्ट्रात जा, मी सिकंदर बरोबर लढाई करेन. तिकडे अनसुया आणि लाची ह्या दोघी मिळून तक्षशिला आणि सिकंदरच्या सैन्याबरोबर वाघिणी सारखे लढल्या. त्या दोघींचे शौर्य, युद्धकला, पाहून यवनी सैनिक अचंबित झाले, अनसूया आपल्या भावाबरोबर म्हणजे अंभिराज बरोबर स्वतः लढली. पोरस आणि बमनी महाराजांची ही परीक्षेची वेळ होती. एकीकडे अलेक्झांडर आणि दुसरीकडे पौरव राष्ट्र. दोघेही एकमेकांना सांगत होते, पुरु सांगतो महाराजांना तुम्ही तिकडे जा म्हणून महाराज पुरुला सांगतात तू तिकडे जा. शेवटी बमनी महाराजनी पौरव राष्ट्रात जायचे ठरवले, तोपर्यंत अंभिराज नी व्युहाची रचना केली. लाचीला व्यूह तोडता येत नव्हते. अनसूयाला व्यूह तोडता येत होते. परंतु ती खुप घायाळ झालेली होती. आंभिराज, काळीज नसलेला माणूस जो आपल्या लहान बहिणीवर प्रेमाचा वर्षाव न करणारा तो आपल्या देशावर काय प्रेम करणार ?

अलेक्झांडरशी दोन हात करून महाराज बमनी, हिंदुकुश पर्वत पार करून पौरव राष्ट्राला येत असताना त्यांच्या डोळ्यासमोर दुष्ट अंभीराज आणि वाघा सारख्या लढणार्या, आपली भार्या अनसूया आणि स्नुषा लाची ह्या दोघी त्यांच्या डोळ्यासमोर दिसत होत्या.

त्यांच्या मनात शंका कुशंकांचा कल्लोळ चाललेला होता. म्हणून मनो वेगाच्या वारुने त्यांना आपण कधी एकदा पौरव राष्ट्रात पोचतो आणि आपण कधी एकदा अनसूया आणि लाचीला पाहतो असे त्यांना झाले होते.

त्या दोघीनी शूरपणाने लढून तक्षशीलेच्या आणि सिकंदराच्या सैनिकांना यमसदनी पाठवलेले होते. अंभिराजने क्रूरपणाने लढून अनसूयेला घायाळ केले. तेवढ्यात बमनी महाराजानी व्यूह तोडून येऊन अनसूयाला सांभाळले. लाची कडून महाराजाना सर्व वृत्तान्त कळला. तेवढ्यात तिथे पुरू पण आला. त्या तिघानी अनसूयेला आधार दिला. तिने लाचीचा हात हातात घेऊन सांगितले की मी आता खूप दिवस जगू शकत नाही.

पौरव राष्ट्राची महाराणी घायाळ वाघीणीसारखी दिसत होती. हे तिघेही काळजीत होते. बमनी महाराजानी राजगुरूना बोलावून महामृत्युंजयाचा होम आणि जप आरंभला. कधी नाही ते अनसूया विश्रांती घेत होती. महाराज आणि पुरुषोत्तम दोघेही खूप दुःखी झाले. पुरू, सारखा म्हणत होता आई, तु मला सोडून जाऊ नकोस. अशी ही पौरवंराष्ट्राची महाराणी अनसूया.तिने अखंड भारताच्या यज्ञात आपली आहुती दिली. तिच्या जाण्याने संपूर्ण पौरव राष्ट्र पोरके झाले.

अखंड भारताचे स्वप्न घेऊन आलेली अनसूया प्रेमळ वीर शूर योद्धा होती. आणि तितक्याच जबाबदारीने महाराणी पद, पुरुषोत्तमची आई म्हणून मानाने सर्व पदे भूषविली होती. जाता जाता भारत जयतू भारत जयतू म्हणत तिने आनंदाने शेवटचा श्वास घेतला. त्यादिवशी झेलम आईचा पण ऊर भरून आला असेल. तिची लाडकी लेक अखंड भारतासाठी लढून अजरामर झाली.

पुरुषोत्तमने आईच्या पोटात असल्यापासूनच अखंड भारताचे स्वप्न आपल्या आईबरोबरच पाहिलेले होते. सहाजिकच अनसूयाला वीरगती प्राप्त

झाल्यावर बमनी महाराज, लाची, पुरू, सर्वजण दुखी झाले. परंतु आईचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी, बायकोचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी, सासूचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी, तिघे ही सज्ज होऊन सिकंदराबरोबर लढण्यासाठी तयार झाले. पुरुषोत्तमचा मामावर राग होताच आणि आता तरी त्याच्या आईच्या वीरगतीला मामाच कारणीभूत झाला होता म्हणून त्याला मामा वर सूड उगवायचा होता. अंभिकुमारने पुरुला संदेश पाठविला, आपण भेटूया. मला तुझ्याशी बोलायचे आहे. परंतु बमनी महाराजांना आणि पुरुला संदेशाबद्दल शंका वाटली. आंभिराज ने पूरुवर आक्रमण करण्याच्या तयारीने सैन्य सज्ज ठेवले होते. त्याच्या मनात पौरव राष्ट्रातल्या सर्वांना मारायचे होते.अंभीराज स्वार्थी दुष्ट क्रूर होता. हे सर्व वाईट गुण त्याच्यामध्ये होते. त्याने स्वतःच्या मुलाला मारण्यासाठी सैनिकांना पाठवले. तक्षशिलेची महाराणी अलकाला हे काहीच माहीत नव्हते.

पूरु तक्षशिलेला पोहोचल्यानंतर त्याला सर्व काही ज्ञात होते. येताना पोरस आणि बमनी महाराज सैन्य घेऊनच आलेले होते. युद्ध चालू होते. युद्धात अंभीराज पळून गेला म्हणून त्यादिवशी पुरू ने मामाला ठार करणारच म्हणून शपथ घेतली. तो दिवस गोकुळाष्टमीचा दिवस होता. कृष्णाच्या मंदिरात खेळ चाललेला होता. कृष्णाने कंसाचा वध केला तसे पुरूने मामाला मारले. अंभिकुमार आणि पुरू खूप छान मित्र होते. बापाच्या खोटं बोलण्याने अंभिकुमार पण पुरूचा शत्रू बनलेला होता. तो संपूर्ण सिकंदरच्या ताब्यात गेलेला होता. आतातरी सिकंदरला मोकळं रानच मिळालं होतं. अंभिराज मरण पावल्यानंतर तिथे अलका आणि अंभिकुमार दोघेच राहिले. तक्षशीलेची महाराणी आणि राजकुमार ह्या दोघांना पुरू आणि बमनी महाराजांबद्दल गैरसमज झाला होता. तिकडे पौरव राष्ट्रात आनंदाची बातमी होती. लाची आणि पुरु आई बाबा होणार होते. ही बातमी महाराज बमनी आणि लाचीच्या बाबांना दस्यु राजांना कळल्यावर ते दोघे

खूप आनंदित झाले.

लाचीच्या बाबांनी लाचीला आपल्या राज्यात घेऊन जाण्यासाठी आग्रह धरला परंतु सर्व परिस्थिती पाहता ते शक्य झाले नाही. पौरव राष्ट्रात आता लाची आई होणार होती म्हणून तिच्या सोबतीला तक्षशीलेची महाराणी अंभिकुमारच्या आई अलकाला घेऊन आल्या नंतर पुरु आणि बमनी महाराज सिकंदर बरोबर लढण्यासाठी, रवाना झाले. अंभिकुमारला लाची खूप आवडत होती. तो तिला पळवून घेऊन जाणार होता, महाराणी अलका ने आंभिकुमारला अडवले. ती सारखी सांगत होती असे वाईट काम करू नकोस. तिच्या पोटात बाळ आहे म्हणून ही तिने सांगितले. तरीपण अंभिकुमार लाचीला पळवून न्यायला लागला, तेवढ्यात पुरू, बमनी महाराज आणि लाचीचे बाबा तेथे आले. त्या सर्वांनी मिळून अंभिकुमार बरोबर दोन हात केले. महाराणी अलका दुःखी झाली, तिला तिच्या मुलाचे वागणे आवडलेले नव्हते. पण पुरूने अलकाला सावरले. अलकाला अंभीकुमार बरोबर लढत असताना वीरगती प्राप्त झाली. आपल्या मुलाच्या वागण्याबद्दल तिला खूप वाईट वाटत होते.

अंभिकुमारला सिकंदरने युद्धाचे डावपेच शिकवले. तू पौरव राष्ट्रात जाऊन पुरुषोत्तमला मदत करायला आलो म्हणून सांग आणि तिकडची सर्व बातमी मला पोचव म्हणून सांगितले. इथे आपलंच नाणं खोटं होते तर कोणीही काही करू शकत नाही .

सिकंदर वयाच्या सोळाव्या वर्षापासून युद्ध करत होता. परंतु पोरस सारखा योद्धा आणि युद्धाची तयारी हे सर्व कधीच अनुभवलेले नव्हते. पोरस बरोबर युद्ध करून तो स्वतः आणि त्याचे सैन्य मेटाकुटीला आले होते. एक आग तर दुसरा पाणी होता. पुरू ने सिकंदरच्या आईला सन्मानपूर्वक तिच्या मुलाकडे सोपवले. छावणीत आल्यानंतर ती म्हणाली पुरूने तुझ्या आईला

तर तुझ्याकडे सुखरूप पोचवले, परंतु त्याची आई गेली, त्याचे काय? ह्या गोष्टीवर सिकंदर बराच वेळ विचार करत बसला. जी आई आपल्या बाळाला अगदी पाच-सहा वर्षांचा असल्यापासून शिकवत होती की संपूर्ण विश्व जिंकून माझ्या पायावर घाल म्हणून. पण आज त्याच आईने अलेक्झांडरला आता युद्ध थांबवा म्हणून सांगितले.

सिकंदरने ऑलिंपियाच्या तोंडून हे ऐकल्यावर तो आश्चर्यचकित झाला. याला कारण हे होते की ती ओरॅकल कडे मांत्रिक विद्या शिकत असताना ओरॅकल ने ऑलिंपियाला सांगितले होते की सिकंदर भारत देशातून परत जिवंत येणार नाही, या गोष्टीवरून ती घाबरलेली होती.

झेलम चे महायुद्ध बरेच महिने, वर्ष, चालू होते. पावसाळा आला त्यामूळे सैन्याची वाताहत झाली. सिकंदरचे सैनिकांनी, पुरुषोत्तम महाराजा पुढे हात टेकले. परंतु सिकंदर ला सोन्याची चिडियाला सोडायचे नव्हते. पोरस म्हणाला, मी जिवंत असे पर्यंत चिडिया तर सोडा, तिचे पीस पण तुम्हाला मिळणार नाही. आणि तसे ठामपणे सांगितले. इकडे अंभिकुमार ने पुरुला मदत करायला आलो म्हणून खोटं सांगितले. चाणक्य पुरूला मदत करत होते. हे अंभिकुमार ने सिकंदरला कळवले. सिकंदर कोणी चांगलं काम करत असतील तर त्यांना वाईट काम करायला लावत असे. परंतु हे सर्व नंतर पुरुला आणि चाणक्याना समजले. महाराणी अलका स्वभावाने खूप चांगली होती. त्या दोघी, लाची आणि महाराणी अलका मनातले सुखदुःख एकमेकींना सांगत होत्या असे समजते की आंभिराज आणि अंभिकुमार दोघेही उगाचच पूरुवर राग राग करत होते.

तक्षशीलेची महाराणी अलका हिचे अनसुयावर, भाचा म्हणून पूरुवर, बमनी महाराजांवर, खूप प्रेम होते. आणि आपुलकी वाटत होती. सिकंदरने पोरसला त्रास देण्यासाठी युद्धात वीरगती प्राप्त झालेल्या सर्वांना

झेलम नदीत टाकण्यास सैनिकांना सांगितले. त्यामुळे नदीचे पाणी गढूळ होऊन नागरिकांना त्रास होऊ लागला आणि परिस्थिती गंभीर झाली. आचार्य चाणक्यांच्या औषध मात्रा आणि उपचार ह्यामुळे सर्व जण बरे होऊन युद्ध करण्यासाठी सज्ज झाले. दुषित पाणी दूषित हवा मुळे राष्ट्रातील अन्नधान्यावर परिणाम झाला.

आचार्य चाणक्य यांच्या आदेशावरून झेलम नदीतील मृतात्मे बाहेर काढून त्यांना अग्निसंस्कार करणे हे चालू ठेवले होते. एवढ्या गंभीर परिस्थितीत बमनीमहाराज, पोरस, महाराणी लाची, हस्ती हे सर्व धैर्याने तोंड देत होते. सर्वजण किती दिवस उपाशी राहणार? सर्वांची भूक भागवण्यासाठी बाहेरून अन्नधान्य आणण्यासाठी हस्ती आणि बरेच जण गेले होते. परंतु दुष्ट सिकंदर आणि त्याच्या माणसांनी अन्नधान्य झेलम नदीत टाकून दिले. पौरव नागरिक, दोन तीन दिवस उपाशी होते. महाराज आणि पूरु सर्वांना छावणीत आश्रय देऊन त्या सर्वांना धीर देण्याचे काम करत होते.

पुरू अखंड भारतासाठी जीवावर उदार होऊन लढत असताना बरोबरचे सैनिक दोन दिवस उपवासी होते. असंच पुरू आणि लाची सैनिकांबद्दल विचार करत होते व त्यांच्या पोटाला काय घालावे याचा विचार करत फिरत असतानाच पुरुच्या पायाला काहीतरी जाणीव होते तेव्हा त्याने वाकून पाहिल्यावर रताळ्या सारखे कंद दिसले, त्याला इतका आनंद झाला. सर्व सैनिकांना ते कंद काढायला सांगितले. सर्वानी ते कंद भाजून खाल्ले. इथे बुडत्याला काडीचा आधार त्याप्रमाणे दोन तीन दिवस उपाशी राहिलेल्या सर्वांना खायला मिळाल्यावर प्रत्येकांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. ते खाऊन सर्वजण परत भारत जयतू, भारत जयतू म्हणून लढायला सज्ज झाले.

हस्ती हा पूरूचा रक्षक. त्याला सिकंदरशी लढता लढता वीरगती प्राप्त झाली. हे पुरुला समजल्यावर पुरू व बमनी महाराज, लाची, सर्वच दुःखी झाले. दुसऱ्या दिवशी पुरूने युद्धभूमीवर आल्यावर पाहिले तो, क्रूर अलेक्झांडर ने हस्तीचे शव एका खांबाला टांगून ठेवलेले,ते पाहून पुरू अलेक्झांडरशी खूप द्वेषाने लढला. हस्तीने,त्याचे वडील रिपूदमन यांच्या सारखीच पौरव राष्ट्राला आणि अखंड भारतासाठी पेटवलेल्या अग्नीमध्ये स्वतःची आहुती दिली. हळूहळू तिकडची परिस्थिती सुधारली. सिकंदर ची बायको रॉक्सी हिला पोरसची भीती वाटत होती. तिच्या मनात पोरसला भेटावेसे वाटत होते. परंतु ते सिकंदरला आवडले नसते हे पण तिला माहित होते. तरी ती ऑलिंपियाला सांगून पोरसला भेटायला ती गेलीच. रॉक्सीने, पोरस पुढे आपल्या नवऱ्याच्या आयुष्याची भीक मागितली आणि हे पण सांगितले की सिकंदर तुझ्यासमोर आल्यावर तु त्याला मारू नकोस.

ह्याला पोरसने असे उत्तर दिले मी काही सांगू शकत नाही, युद्ध तर आम्ही करणारच. पण पोरस सिकंदर सारखा क्रूर नव्हता. इकडे, रॉक्सी पोरस कडे गेलेली बातमी सिकंदरला समजल्यावर तो खूप चिडला आणि नंतर सिकंदरने पारस राजकन्या (बारसिंन बरोबर) विवाह करून तिला पौरव राष्ट्रात पोरसला मारण्यासाठी पाठवले. पारसची राजकन्या पौरव राष्ट्रात आल्यापासून चाणक्यांची तिच्यावर कडक नजर होती. पण नंतर ती तिथून निघून गेली. पोरसने मगध देशाला जाऊन धनानंद कडे सैन्याची मागणी करावी असे चाणक्य आणि बमनी महाराजांचे म्हणणे होते. धनानंद सोळा जनपद मध्ये खूप श्रीमंत राजा होता. पण तो स्वतः नापित घराण्याचा असल्याने क्षत्रिय लोकांना मदत करत नव्हता. लोभी क्रूर असा ह्या धनानंदने पोरस कडे धनाची मागणी केली. त्यावेळेला धनानंदने फक्त ३०,००० सैन्य पाठविले. धनानंद ने महाराज बमनी आणि आचार्य चाणक्य यांचा छळ करून मग पौरव राष्ट्राला त्यांना पाठविले. नंतर धनानंद फितूर होऊन

सिकंदर कडे गेला. परंतु पोरस संकटांना न घाबरता लढत राहिला. सिकंदर समोर आल्यावर पोरस हेच सांगत होता. मी मेलो तरी माझ्या जन्मभूमीत मरणार आहे. तसेच पोरस सिकंदरला हेही सांगतो की, आम्ही भारतीय दुसऱ्या देशावर कधीच क्रूर पणाने आक्रमण केलेले नाही आणि स्वतःहून आक्रमण करत नाही. करणार नाही. हे  पोरसचे वाक्य ऐकून सिकंदर त्याच्यावर विचार करू लागला. त्याला आपल्या देशाची आठवण आली.

लाची च्या पोटात बाळ असताना पण ती युद्धभूमीवर कचरत किंवा घाबरून मागे हटली नाही. तिचे विचार खूप वेगळे होते. बाळाला आतापासूनच आपले आई बाबा कसे आहेत कसे होते हे कळू दे आणि हो अखंड भारताची ज्योत त्याच्यामध्ये पण पेटुदे म्हणून जोषाने युद्ध करत होती. दस्यु राजाना सिकंदर बरोबर लढताना वीर गती प्राप्त झाली. आपल्या शेवटच्या श्वासापर्यंत ते आपली मुलगी लाची आणि पुरु बरोबर होते .

पौरव राष्ट्राचा अंकुर लाचीच्या पोटात वाढत होता. ती दस्यु असून पौरव राष्ट्राची महाराणी झाली आपल्या लाडक्या पुरूची राणी झाली म्हणून तिला त्याचा अभिमान होता. लाची खूप आनंदित होती. युद्धात महाराज बमनीना पण वीरगती प्राप्त झाली. त्यांनी असे उद्गार काढले की अखंड भारताच्या यज्ञात आहुती देणे खूप भाग्याचे आहे. त्यावेळेस पुरू त्यांच्या जवळच होता. मायेची माणसं गेल्यावर खूप दुःख होते. पूरूकडे आता पाचशे सैनिकच होते. त्या सर्वांना आपल्या महालात बोलावून आपण सारे एकत्र राहूया असे म्हणून ते सर्वजण एकत्र राहिले. त्या प्रत्येकामध्ये अखंड भारताची ज्योत पेटलेली होती, सर्वजण आनंदाने भारत जय तू भारत जय तू अशी घोषणा देत, स्वाभिमानाने आपण सिकंदरला परत खाली हाताने मॅसेडोनिया पाठवूया असे गर्जत हातात शस्त्र घेऊन लढायला सिद्ध झाले.

सिकंदर आपले राहिलेले सैन्य घेऊन राजमहालाकडे आला. त्याच्या

सैनिकानी राजमहालाचे दरवाजे तोडण्याच्या आधीच पौरव सैनिकानी राजवाड्याच्या उंच टोकावरून शस्त्रांचा मारा सुरू केला. ह्या सर्व प्रकाराने सिकंदर आणि त्याचे सैनिक घाबरले, नंतर सिकंदर आणि पोरस ह्या दोघांमध्ये द्वंद्व युद्ध झाले. सिकंदर म्हणाला पुरुला तू माझ्या पायावर डोकं ठेवून माफी माग, पण पोरस ने लगेच उत्तर दिले की त्याच्यासाठी माझा जन्म झाला नाही. तू मला मारशील पण माझ्या विचारांना मारू शकणार नाहीस, तू स्वतःला ईश्वर मानतोस, स्वतःला ईश्वर मानणारा कधीच ईश्वर नसतो. मी माझ्या देशातच आहे. माझ्या मातेच्या आईच्या कुशीतच निद्रा घेणार. तुझ्यासारखा मी दुसऱ्या देशात नाही माझा देश स्वतंत्र होता आणि स्वतंत्र राहणार. सिकंदर आणि पोरस लढत असताना रॉक्सी आणि ऑलिंपिया दोघी तिथे आल्या. सिकंदरच्या आईने मुलाला सांगितले, आता युद्ध थांबव. खरे तर ऑलिंपियाला आपला मुलगा धडधाकट आणि जिवंत आहे हे पाहूनच आनंद झाला होता.

सिकंदर ने पुरुला विचारले, आता तुझ्या मनात काय आहे? पुरूने ताठमानेने सांगितले की, तुम्हा सर्वांना इथून रिकाम्या हाताने परत पाठवायचे ही माझी इच्छा आहे. शेवटी सिकंदर मुकद्दर ला अभिवादन करून बोलणार तेवढ्यात त्याची तलवार खाली पडली, ती पडलेली तलवार उचलायला तो खाली वाकला. तेंव्हा त्याचा सेनापति सेल्यूकस पोरसवर वार करणार होता, पणअलेक्झांडर त्याला थांबवून पोरसला आपली तलवार देऊन नतमस्तक होऊन म्हणाला, वयाच्या सोळाव्या वर्षापासून मी खूप युद्ध लढत आलोय आणि जिंकत आलोय पण तुझ्यासारखा स्वाभिमानी आणि धाडसी माझ्या आयुष्यात कोणीच आला नाही. तू मला माझे वाईट विचार बदलायला भाग पाडलेस. मी खूप प्रकाराने तुला त्रास दिला, तुझ्या मायेच्या माणसांवर हल्ला केला, पण तू कशानेच डगमगला नाहीस म्हणून त्याने आपले दोन्ही बाहू त्याच्या पुढे सरसावून त्याला आलिंगन दिले.

पुरू सिकंदर ला म्हणाला, माझ्या बायकोच्या पोटात आमच्या वंशाचा दिवा तेवत आहे. भले त्याच्यावर माझा वरदहस्त राहो न राहो अखंड भारतासाठी त्याचे आई-बाबा आजी-आजोबा शेवटच्या श्वासापर्यंत लढले हे तरी त्याला नक्की कळेल. सिकंदर ने पुरुला सांगितले मी तुझ्याकडून खूप चांगले संस्कार घेऊन जातो आहे, हे दृश्य पाहून महाराणी लाची आणि आचार्य चाणक्य यांच्या डोळ्यात आनंदाश्रू आले, दोघांचे डोळे पाणावले कारण युद्धातून सहीसलामत वाचणे हे नशिबात असावे लागते.

सिकंदर ने आपल्या सैन्याला सांगितले आपण सारे आपल्या मायभूमीला जाऊया माझ्या मित्राने सांगितल्या प्रमाणे आपली माय भूमी किती महत्त्वाची आहे हे समजले. दुसऱ्यांच्या जमिनीची खूप नासाडी केली. आता आपल्या मायभूमीला प्रेम देऊया.

पुरूने सिकंदरला दिलेली भेट अंगठी मागितली. देतानाच पोरसने सिकंदरला सांगितले होते की मी युद्ध जिंकूनच तुझ्याकडून अंगठी घेणार. सिकंदर ने त्याला त्याची अंगठी आनंदाने भेट परत केली. पोरसचे एक वाक्य सिकंदरला खूपच आवडले होते, आपल्या मातृभूमी पेक्षा काहीच मौल्यवान नाही असे सिकंदर सारखे उच्चारत होता, दोन्हीकडचे नागरिक आणि सैनिक पोरस, पोरस, आणि सिकंदर, सिकंदर, असा जयजयकार करू लागले आणि लाडक्या पुरुचा सिकंदरने ही जयजयकार केला. हे पाहून मॅसिडोनियाचा सेनापती सेल्यूकस मात्र विचलित झाला, त्याला सिकंदरचे वागणे आवडले नाही सेल्युकसची नजर भारतावर होती. पौरव राष्ट्राच्या महाराणी लाचीने औक्षण केल्यावर सर्वांनी सिकंदरचा निरोप घेतला आणि त्याची पाठवणी केली. अंभीकुमारला काहीच माहीत नव्हते. अनसुया कशी गेली? पुरू बरोबर काय काय वाईट घडले? त्याला फक्त हेच माहित होते की पुरू आपल्या वडिलांचा खुनी आहे. अंभीला लाची आवडत होती. पूरुचे

सर्व काही चांगले झालेले त्याला बघवत नव्हते, पुरु ने युद्ध पण जिंकले. सिकंदर जाता जाता त्याचा मित्रही झाला. तसेच पुरुला मुलगा पण झाला. हे सर्व पाहून अंभीला पूरुवर असूया वाटली, म्हणून अंभी पुरुच्या बाळाला पळवणार होता. महाराणी लाची खूप सतर्क झालेली होती, तिचा आता कोणावरच विश्वास नव्हता.

तरीही अंभिकुंमार लाचीचा डोळा चुकवून बाळाला पळवून घेऊन गेला. महाराणी लाची आणि पुरुषोत्तम दोघांनी मिळून त्याचा पाठलाग करून बाळाला घेतले. तेवढ्यात तिथे आचार्य चाणक्य यांचे आगमन झाले. पुरू आणि लाची दोघांनी आपल्या बाळाला चाणक्यांच्या हातात सोपवले. बाळाचे नाव काय ठेवायचे विचारून त्याचे नाव मलयकेतू असे ठेवले. दोघांनी महाराणी लाची आणि महाराज पूरुनी बाळाला मलय गिरी सारखी तुझी कीर्ती वाढू दे, असा आशीर्वाद दिला. आणि चाणक्याना सांगितले की आपण सारे मिळून अखंड भारताची ज्योत तेवत ठेवूया.

समस्त भारताचे वीर जनहो आपण सारे मिळून जे कोणी भारताबद्दल वाईट बोलत असतील भारताचे अहित करणार असतील त्या वाईट विचारांचा त्या वाईट वृत्तीचा नायनाट करून भारताला अखंड ठेवण्याचे कार्य करूया.

भारत जयतु भारत जयतु.

भारत मातेच्या चरणाशी ही छोटी सी सेवा अर्पण

जाताना सिकंदर वेगळ्या वाटेने गेला. जिथून तो जात होता तिथल्या वीरांच्या आक्रमणाला त्याला तोंड द्यावे लागले. सिकंदरचे सैन्य इतके थकले होते, की आपण आपल्या देशात जिवंत पोचू की नाही याची त्यांना शाश्वती नव्हती. जाट, पंजाब, सिंधू नदीच्या वाटेवरुन जाताना हरियाणा, पंजाब, गांधार पर्यंत पोहचल्यावर सिंकदरने तिथे बाण लागून

शेवटचा श्वास घेतला असे सांगितले जाते. प्रत्येक लेखक, इतिहासकारानी वेगवेगळे लिहिले आहे काहीनी असे कळविले की सिकंदर आपल्या देशी गेल्यावर त्याच्यामध्ये आणि ओलिंपियाच्या वागण्यात खूप बदल झाला होता. नंतर तो बाबा होणार होता परंतू तो आपल्या बाळाचे तोंड पाहू शकला नाही कारण आजारी पडून त्याचा मृत्यू झाला. काही लेखकांनी असे ही लिहिले आहे की सिकंदरचा शेवट झाला हे पोरसला कळल्यावर त्याने असे उद्‌गार काढले की मी पुरु पुरशोत्तम होतो सिकंदरने मला पोरस केले. सिकंदरसाठी पुरुच्या मनात चांगलेच विचार होते.

काही लेखकांनी पुरुच्या मुलाचा पण उल्लेख केलेला आहे. यवनी इतिहासात स्वतःचा मोठेपणा दाखण्यासाठी पोरसची या महायुद्धात हार झाली, परंतु हे चुकीचे आहे. शेवटी अलेक्झांडरने आजारी असताना त्याच्या हकीमाला सांगितले माझा शेवट झाल्यावर सर्व संपत्ती वाटेवर पसरुन टाका, ज्या वाटेवरुन मृत शरीर शेवटच्या ठिकाणाला नेतात तिथे आणि शवपेटीतून दोन्हीहात बाहेर खाली पडलेले असावेत सिकंदर जग जिंकून शेवटी खाली हातानेच गेला म्हणून जगाला कळू दे म्हणून. बऱ्याच कव्वाली मध्ये पण या खाली हातांचा उल्लेख आहे.

मौतने जमाने को यह समां दिखा डाला,
कैसे कैसे उस गम को खाक मे मिला डाला...
याद रख, सिकंदर के हौसले तो भारी थे,
जब गया था दुनिया से दोनो हाथ खाली थे...
चढता सुरज धीरे धीरे ढलता है ढल जायगा....

गायक : जहिद नजान